नागपूर
# महासागर वृत्तसागर
■ बुधवार, दि. ६, ऑगस्ट २०२५ ■

## महावितरणचे वीज बिल डाऊनलोड करण्यासाठी आता लॉगिन अनिवार्य

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
सायबर सुरक्षितता तसेच वीज ग्राहक माहितीच्या गोपनीयतेसाठी महावितरणच्या लघुदाब वर्गवारीच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत अधिकृत संकेतस्थळावरून ऑनलाइन डाऊनलोड करण्यासाठी आता संबंधित ग्राहकांना नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य करण्यात आले आहे.

महावितरणच्या अधिकृत संकेतस्थळावरील वीजदेयक अवलोकन/भरणा पेजवर लघुदाब वर्गवारीतील घरगुती, व्यावसायिक, औद्योगिक व इतर ग्राहकांना चालू महिन्याच्या वीजबिलाची पीडीएफ प्रत ऑनलाइन डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध करून देण्यात आली आहे. मात्र याआधी केवळ १२ अंकी ग्राहक क्रमांक सबमीट करून वीजबिल डाऊनलोड करण्याची सोय उपलब्ध होती. आता नव्या बदलात वीज बिल लॉगिनशिवाय ऑनलाइन भरण्याचा पर्याय खुला ठेवण्यात आला आहे. मात्र पीडीएफ वीजबिल डाऊनलोड करण्यासाठी नोंदणीकृत प्रवेश (लॉगिन) करणे अनिवार्य आहे. लॉगिनची लिंकदेखील वीजदेयक अवलोकन/भरणा पेजवर उपलब्ध आहे. तसेच ज्या ग्राहकांनी आतापर्यंत लॉगिनसाठी नोंदणी केलेली नाही त्यांनी ग्राहक क्रमांक, भ्रमणध्वनी क्रमांक तसेच ई-मेल माहिती भरून नोंदणी करणे तसेच प्रवेश नाम (लॉगिन आयडी) व पासवर्ड निश्चित करणे आवश्यक आहे.

# मनसे कार्यकर्त्यांचा नागपुरात राडा

## येस बँकेच्या पाटीला फासले काळे, कर्मचाऱ्यालाही केली मारहाण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या कार्यकर्त्यांनी नागपुरात येस बँकेच्या शाखेत मोठा राडा केला आहे. या बँकेच्या अधिकाऱ्यांनी एका शेतकऱ्याच्या जेसीबीचा परस्पर लिलाव केला. त्याची तक्रार शेतकऱ्याने मनसेच्या पदाधिकाऱ्यांकडे केली. त्यानंतर मनसैनिकांनी बँकेवर चालून जात बँकेच्या पाटीला काळे फासले. तसेच एका कर्मचाऱ्याला मारहाणही केली. या घटनेमुळे बँकिंग क्षेत्रात चांगलीच खळबळ माजली आहे.



राज्यात सध्या मराठी - अमराठी वादासह डान्स बारच्या मुद्यावरून वातावरण तापले आहे. मनसेने या दोन्ही मुद्यांवरून अत्यंत आक्रमक भूमिका घेतली आहे. मराठीच्या मुद्यावरून त्यांनी सरकारविरोधात थेट रस्त्यावर उतरण्याची भाषा केली. विशेषतः या प्रकरणी त्यांनी वेगवेगळ्या बँकांमध्ये जाऊन हिंदीच्या जागी मराठीचा वापर करण्याचा आग्रह धरला. यामुळे मोठा वाद झाला.

त्यानंतर मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी शेतकरी कामगार पक्षाच्या मेळाव्यातून रायगड जिल्ह्यातील वाढत्या डान्स बारच्या मुद्यावर बोट ठेवले. तद्नंतर मनसैनिकांनी एका डान्सबारमध्ये शिरून तोडफोड केली. या पार्श्वभूमीवर मनसैनिकांनी आता नागपुरातील येस बँकेत जात तोडफोड करण्याचा प्रयत्न केला आहे.

यासंबंधीच्या माहितीनुसार, नागपूर जिल्ह्यातील शेतकरी इंद्रजीत मुडे यांनी जेसीबी खरेदी करण्यासाठी येस बँकेकडून कर्ज घेतले होते. बँकेने हा जेसीबी फायनान्स केला होता. मात्र, काही हप्ते न भरल्यामुळे येस बँकेने हा जेसीबी जप्त केला.

त्यानंतर मुडे यांनी हा जेसीबी परत मिळवण्याचे प्रयत्न सुरू केले. बँकेच्या सूचनेनुसार त्याची पैसे भरण्याचीही तयारी होती. पण बँकेने त्यानंतरही त्याच्या जेसीबीचा परस्पर लिलाव केला. हे समजल्यानंतर सदर शेतकऱ्याने मनसेच्या स्थानिक पदाधिकाऱ्यांकडे धाव घेतली. त्यांनी त्यांच्याकडे आपली कैफियत मांडल्यानंतर मनसैनिकांनी मंगळवारी दुपारी येस बँकेच्या स्थानिक शाखेत धाव घेत तोडफोड करण्याचा प्रयत्न केला.

यावेळी काही कार्यकर्त्यांनी बँकेच्या नामफलकाला काळे फासले. तसेच एका कर्मचाऱ्यालाही किरकोळ मारहाण केली. यावेळी त्यांनी बँकेविरोधात जोरदार घोषणाबाजीही केली. या अनपेक्षित घटनेमुळे बँकेत एकच खळबळ माजली. सर्वच कर्मचाऱ्यांची भीतीने गाळण उडाली. बँकेच्या अधिकाऱ्याने गरीब शेतकऱ्याची फसवणूक केल्यामुळे आम्ही हे आंदोलन केले. पीडित शेतकऱ्याने बँकेला आपल्या जेसीबीचा लिलाव न करण्याची विनंती केली होती. त्याने आपल्याकडील थकबाकीही भरण्याची तयारी दर्शवली होती. पण त्यानंतरही बँकेने जेसीबीचा लिलाव केला, असा आरोप मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी या प्रकरणी केला.

या घटनेनंतर सदर पोलिसांनी 50 पेक्षा जास्त मनसे कार्यकर्त्यांना ताब्यात घेतले आहे. बँकेच्या एक्झिक्युटिव्हला मारहाण केल्याप्रकरणी मनसे कार्यकर्त्यांवर गुन्हा दाखल होणार आहे. शेतकरी इंद्रजीत मुडे यांचा जेसीबी परत मिळत नाही, तोपर्यंत आंदोलन सुरूच राहील, असा इशारा मनसेच्या वतीने देण्यात आला.

# पालकमंत्र्यांच्या नावाने पोलिसांना धमकी

### कठोर कारवाईचे आदेश

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
राज्याचे महसूल मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या नावाने पोलिसांना दमदाटी करणाऱ्या तीन जणांवर अखेर जुनी कामठी पोलिसांनी गुन्हा दाखल केला. या प्रकाराची गंभीर दखल घेत स्वतः पालकमंत्री बावनकुळे यांनी आरोपींवर कठोर कारवाईचे आदेश देत लेखी तक्रारही दाखल केली. ३ ऑगस्टला जिल्ह्यातील जुनी कामठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील हॉटेल ईडन ग्रीन्स येथे हा प्रकार घडला होता.

हॉटेल ईडन ग्रीन्स येथे रविवारी फ्रेंड्स अँड बियाँड हा कार्यक्रम झाला. येथे पोलिसांनी परवानगी देताना आखुन दिलेल्या अटी व शर्थीर्चे पालन होत नव्हते. दरम्यान दोन गटांमध्ये हाणामारी झाली. या वादाची माहिती मिळताच जुनी कामठी ठाण्याचे पोलीस पथक कार्यक्रमस्थळी पोचले. त्यावेळी आरोपी वेदांत छाबरिया, रितेश चंद्रशेखर भदाडे, आकाश बनमाली यांनी पोलिसांना पालकमंत्री चंद्रशेखर



बावनकुळे यांच्या नावाने दमदाटी केली. पोलिसांनी गर्दी शांत करण्यासाठी संगीत बंद करून पार्टी थांबवली. वादाला खऱ्या अर्थाने सुरूवात झाली, ती पोलिसांच्या हस्तक्षेपानंतर. पोलीसांनी ठरवून दिलेल्या अटी वर शर्थीचे उल्लंघन होत असल्याने पार्टी आयोजकांना मज्जाव केला असता वेदांत छाबरिया हा पोलिसांना धमकावत होता. गरज पडल्यास मी थेट महसूल मंत्री बावनकुळे यांच्याशी बोलेन असे तो म्हणाला.

## ऑनलाईन पैसे पाठविण्याच्या नावावर जवानाला चुना

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
ऑनलाईन रक्कम पाठविण्याची विनंती करून लष्करातील जवानाचा मोबाईल चोरी करण्यात आला. विशेष म्हणजे आरोपीने मोबाईलमधून एटीएम कार्डसह पिनकोड मिळवून वेगवेगळ्या एटीएममधून रक्कम काढली आणि लाखोंचे दागिने खरेदी करून दिल्लीतील सराफाला विकले. लोहमार्ग पोलिसांनी अत्यंत कौशल्याने ही चोरी उघडकीस आणली आणि आरोपीला अटक केली. आझाद खान नासीर हुसेन (32) रा. दिल्ली असे अटकेतील आरोपीचे नाव आहे.

आझाद हा मूळचा बवाना (दिल्ली) येथील रहिवासी असून त्याला आई आणि दोन भाऊ आहेत. तिघेही भाऊ पोलिस अभिलेखावर आहेत. चोरी करण्यासाठी ते शक्कल लढवितात. विशेष म्हणजे लष्करातील जवानांनाच लक्ष्य करतात. ग्वालियर येथील रहिवासी फियार्दी अनूजसिंग कुशवाह (42) हे लष्करात आहेत. घटनेच्या दिवशी ते ग्वाल्हेरला जाण्यासाठी नागपूर रेल्वेस्थानकावर आले. फलाट क्रमांक एकवर असताना आरोपी त्यांना भेटला. माझा मोबाईल काम करीत नाही, ऑनलाईन रक्कम घरी पाठवायची आहे, तुम्ही मदत करा, अशी आरोपीने कुशवाह यांना विनंती केली. कुशवाह यांनी विश्वास ठेवून ऑनलाईन रक्कम पाठविण्यासाठी स्वतःच्या मोबाईलने प्रक्रिया केली. या दरम्यान आरोपीने त्यांच्या मोबाईलचा पिन नंबर आणि पिनकोड पाहून घेतला. काही वेळात गाडी आल्यानंतर प्रवाशांच्या गर्दीत कुशवाह यांचा मोबाईल चोरला. मोबाईलच्या कव्हरमध्येच त्यांचे एटीएम कार्ड होते. त्या कार्डद्वारे आरोपीने वेगवेगळ्या बँकांच्या एटीएम मशीनमधून रोख रक्कम काढली. इतवारी परिसरात जाऊन 3 लाख 25 हजार रुपये किंमतीचे दागिने खरेदी केले. ते संपूर्ण दागिने दिल्लीतील एका सराफा दुकानदाराला विकले. वर आणि खाली पाचशेची नोट आणि आतमध्ये कागद ठेवून नोटांचे बंडल तयार करतो.

### सीसीटीव्ही फुटेजवरून लागला सुगावा

तक्रार मिळताच पोलिस निरीक्षक गौरव गावंडे यांनी या घटनेची गंभीर दखल घेत गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिले. आरोपीच्या शोधासाठी पथक तयार केले. या पथकात उपनिरीक्षक दिलीप सुपले, पोहवा संजय पटले, पुष्पराज मिश्रा, अमोल हिंगणे, अमित त्रिवेदी आणि राजेश पराते यांचा समावेश होता. पथकाने सीसीटीव्ही फुटेज तपासून आरोपीला शोधून काढले. दिल्लीसह वेगवेगळ्या ठिकाणी शोध घेत असताना आरोपी नागपूर स्थानकावरच सापडला. ही कारवाई पोलिस अधीक्षक मंगेश शदे, दत्ताराम राठोड आणि पांडुरंग सोनवणे यांच्या मार्गदर्शनात करण्यात आली.

## मातृसेवा संघ महाल शाखेच्या स्थापना दिनानिमीत्त उत्कृष्ट परिचारिका पुरस्कार

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
मातृ सेवा संघ महाल शाखेच्या स्थापना दिनाच्या निमित्ताने अलीकडेच उत्कृष्ट परिचारिका पुरस्कार प्रदान करण्यात आला. या कार्यक्रमाला प्रमुख वक्ता म्हणून पुरूशोत्तम बोरकर व अध्यक्ष ईरावती दाणी यांची उपस्थित होती. प्रदीप कऱ्हाडकर यांनी दिलेल्या देणगीतून त्यांच्या मातोश्री स्व. मनोरमा कऱ्हाडकर यांच्या स्मृतीप्रित्यर्थ परिचारिका प्रशिक्षण केंद्रातील विद्यार्थिनींना हा पुरस्कार दिला जातो.



गुणवंत विदयाथीर्नींना प्रमुख वक्ता पुरूशोत्तम बोरकर व अध्यक्ष ईरावती दाणी व डॉ. अंकिता कोठे यांच्या हस्ते प्रथम वर्ष पुरस्कार प्रिया धापोडकर व निकीता सराटकर तसेच व्दितीय वर्ष पुरुस्कार सिमरन उईके व प्राजक्ता खंडारकर यांना देण्यात आला.

2025 चा उत्कृष्ट परिचारिका पुरस्कार हा अदिती हुद्दार यांनी जाहीर केला. पाहुण्यांच्या हस्ते सिस्टर राजेश्वरी झाडगावकर यांना प्रदान करण्यात आला. सिस्टर राजेश्वरी झाडगावकर यांनी आपले मनोगत व्यक्त केले व सर्वांचे आभार मानले. पुरोशत्तम बारेकर म्हणाले रुग्णाची सार्वात जवळची व्यक्ती नर्स असते. नर्सने रुग्णांसोबत प्रेमाने बोलणे. रुग्णाला पुढील उपचाराकरिता तायार करणे. रुग्णाचे दुःख जाणून घेणे, अशी तारेवरची कसरत नर्सला करावी लागते.

प्रत्येक नर्स चोवीस तास रूग्णासाठी अविरत काम करित असतात. कार्यक्रमच्या अध्यक्ष ईरावती दाणी यांनी विश्वास जोशी यांचे आभार मानले. नर्सेस या डॉक्टर्स व टिचर्स यांच्या नेतृत्वाखाली काम करतात व त्या शिकत असतात. डॉक्टर व टीचर्स जे शिकवतात ते त्यांच्या कामाचे व महत्त्वाचे असते, असे त्या म्हणाल्या. त्यांनी सिस्टर राजेश्वरी झाडगावकर व आएएनएम पुरस्कारप्राप्त विद्यार्थिनींचे अभीनंदन केले. प्रास्ताविक सदस्य जयश्री बन्सोड यांनी केले.

## भारतीय जनता पक्षाची नागपूर ग्रामीणची कार्यकारिणी जाहीर

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
भारतीय जनता पार्टीच्या वतीने नागपूर जिल्ह्यासाठी मंडळ निहाय जंबो कार्यकारणी जाहीर करण्यात आली आहे. पक्षाचे जिल्हा अध्यक्ष आनंदराव राऊत यांनी कार्यकारणी मध्ये तरुणांना तसेच सर्व भागांना न्याय देण्याच्या दृष्टीने समतोल साधत नवीन कार्यकारणी जाहीर केली आहे. तालुक्यातील प्रत्येक भागातील कार्यकर्त्यांना मोठ्या प्रमाणात संधी मिळाल्याने आगामी निवडणुकीत त्याचा फायदा भाजपला निश्चितपणे होणार असल्याचा विश्वास जिल्हा अध्यक्ष आनंदराव राऊत यांनी व्यक्त केला आहे..



भाजप जिल्हा कार्यकारणी पुढील प्रमाणे जिल्हाध्यक्ष - आनंदराव राऊत जिल्हा महामंत्री - (अनिल निधान, रिंकेश चवरे, राहुल किरपान, शुभांगीताई गायधने) जिल्हा कोषाध्यक्ष - (अजय अग्रवाल) जिल्हा उपाध्यक्ष - (गुज्जू यादव, डॉ मुकेश मुदगल, राजेश रंगारी, रूपचंद कडू, संजय मुलमुले, विजयालक्ष्मीताई भदोरिया, सुनंदाताई दिवटे, मंगलाताई कारेमोरे) जिल्हा मंत्री - (सुभाष कावटे, जितेंद्र बैस, रमेशराव चिकटे, विशाल चामट, अतुल हजारे, प्रमिलाताई दंडारे, आशाताई पनीकर, कुमुदताई प्रगट) जिल्हा प्रसिद्धी प्रमुख - (कपिल आदमने) विविध आघाड्याचे अध्यक्ष पुढील प्रमाणेः- जिल्हा महिला आघाडी अध्यक्ष -डॉ. प्रीतीताई मानमोडे जिल्हा युवा मोर्चा अध्यक्ष - चेतन खडसे जिल्हा अनु.जाती मोर्चा अध्यक्ष- सतीश डोंगरे जिल्हा अनु.जमाती मोर्चा अध्यक्ष- हरीश कंगाली जिल्हा अल्पसंख्यांक मोर्चा अध्यक्ष - मोहसीन पटेल जिल्हा किसान मोर्चा अध्यक्ष- राजेश ठाकरे जिल्हा ओबीसी मोर्चा अध्यक्ष - सुनील जुवार जिल्ह्यातील इतर सदस्य व विविध आघाड्याचे पदाधिकारी यांची जम्बो कार्यकारणी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

## १० ऑगस्टला नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
केंद्रीय रस्ते वाहतूक व महामार्ग मंत्री नितीन गडकरी यांचा जनसंपर्क कार्यक्रम रविवार, दि. १० ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आला आहे. खामला चौकाजवळील ज्युपिटर शाळेच्या बाजूला मा. मंत्री महोदय यांच्या जनसंपर्क कार्यालयात सकाळी ११ ते दुपारी १ या वेळेत हा कार्यक्रम होईल. या वेळेत मंत्री महोदय नागरिकांची निवेदने स्वीकारतील. मा. मंत्री महोदय नागरिकांना व्यक्तिशः भेटतील आणि त्यांच्याशी संवाद साधतील. नागरिकांनी आपल्या समस्या, अडचणी, मागण्या लेखी स्वरुपातच



आणाव्यात. तसेच आपली लेखी निवेदने मंत्री महोदयांना द्यावीत, असे आवाहन करण्यात आले आहे. त्यानंतर दुपारी १ ते २ या कालावधीत नितीन गडकरी आपल्या जनसंपर्क कार्यालयात भाजपचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांना भेटतील.

## जलपर्णी रोजगार देणारा उद्योग : विजयलक्ष्मी बिदरी

### मनपाच्या जलपर्णी हस्तशिल्प केंद्राचे विभागीय आयुक्तांच्या हस्ते उद्घाटन

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :
नागपूर महानगरपालिकेच्या समाज विकास विभागाच्या कौशल्य विकास केंद्राने विकसित केलेल्या तलावातील पर्यावरणाला घातक अशा जलपर्णी वनस्पतीपासून विविध गृहोपयोगी वस्तूंचे उत्पादन करण्याच्या प्रकल्पाच्या हस्तशिल्प केंद्राचे उद्घाटन विभागीय आयुक्त विजयलक्ष्मी बिदरी यांच्या हस्ते मंगळवारी (ता.५) पारडी येथील कौशल्य विकास केंद्रात झाले.



यावेळी राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरु डॉ. माधवी खोडे-चवरे, नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी, अतिरिक्त वैष्णवी बी., समाज विकास विभागाच्या उपायुक्त डॉ. रंजना लाडे, सहाय्यक आयुक्त विजय थूल, अजय बहुउद्देशीय संस्थेच्या संचालिका स्वाती धोटकर उपस्थित होते.

तलावातील निरोपयोगी अशा जलपर्णी वनस्पतीपासून आता हस्तशिल्प वस्तू तयार होत असल्याने यातून महिला बचत गटांना आर्थिक उत्पन्नाचे साधन मिळाले आहे. यावेळी जलपर्णीपासून तयार करण्यात आलेल्या कलात्मक वस्तूंचे प्रदर्शन लावण्यात आले होते. या वस्तू चंद्रपूर जिल्ह्यातील भद्रावती येथील अजय बहुउद्देशीय संस्थेने उत्पादित केलेल्या आहेत.

यावेळी बोलताना विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी म्हणाल्या, जलपर्णीमुळे तलावातील पाणी प्रदूषित होते. पर्यावरणाला घातक ठरवणाऱ्या जलपर्णीपासून ग्राहकोपयोगी वस्तूंची निर्मिती करुन नागपूर महानगरपालिकेने अभिनव उपक्रम राबविला आहे. हा प्रकल्प महिलांना रोजगार मिळवून देण्याचे साधन होऊ शकते. शासकीय कार्यालय, विद्यापीठ तसेच नागपूर महानगरपालिकेच्या कार्यालयात या केंद्रातील वस्तू घेण्याचा आग्रह केला जाईल. नागपूरमध्ये या वस्तूंना चांगली बाजारपेठ उपलब्ध होईल, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी बोलताना मनपा आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी म्हणाले, पर्यावरणासाठी धोकादायक ठरलेल्या जलपर्णीपासून घरगुती वस्तू तयार करण्याचा हा अभिनव उपक्रम महिलांना सक्षम करणारा आहे. जलपर्णी हा पर्यावरणासाठी घातक होता. यापासून वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्याचे अजय बहुउद्देशीय संस्थेने पुढाकार घेतला. कमी वेळेत त्यांनी महिला बचत गटांना प्रशिक्षित केले. यातून महिलांना उपजिविका करण्याचे साधन मिळू शकते. यासाठी चिकाटीने महिलांनी या उपक्रमात काम करावे.

यावेळी बोलताना राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे म्हणाल्या, यातून महिला आर्थिकदृष्ट्या सक्षम होण्यास मदत होणार आहे. ही सुरवात छोटी असली तरी यातून मोठा आपण उभारू शकतात, अशा प्रकल्पातून महिलांना प्रेरणा व उर्जा मिळेल असेही डॉ. खोडे- चवरे म्हणाल्या.

नागपूर शहरातील अंबाझरी तलावासह इतर तलावांमध्ये जलपर्णी वनस्पती मोठ्या प्रमाणावर आढळते. या वनस्पतीमुळे तलावातील प्रदूषण वाढते. या निरोपयोगी जलपणीर्पासून वस्तूंची निर्मिती करण्याचा प्रकल्प समाज विकास विभागाच्या कौशल्य विकास केंद्राने राबविण्याचा निर्णय घेतला. या वनस्पतीच्या पानांवर प्रक्रिया करून त्यापासून विविध वस्तू तयार करण्याचा प्रकल्प काही दिवसांपूर्वी सुरू करण्यात आला. नागपूर महानगरपालिका आणि डीएवाय एनयूएलएमच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबविला जात आहे. यासाठी शहरातील महिलांच्या स्वयंसहायता बचत गटांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यांना जलपणीची पाने तोडण्याचे काम देण्यात आले. तसेच या महिलांना या पानांपासून विविध वस्तू तयार करण्याचे प्रशिक्षण देण्यात आले. उपयोगात येणाऱ्या वस्तू या केंद्रात तयार करण्यात येत आहे. यामुळे जलपणीर्सारख्या वनस्पतीला तलावातून नष्ट केले जात आहे. तसेच या पानांपासून गृहोपयोगी वस्तू तयार केल्या जात आहे. हा नागपूर महानगरपालिकेचा अभिनव असा उपक्रम ठरला आहे, अशी माहिती मनपाच्या उपायुक्त डॉ. रंजना लांडे यांनी कार्यक्रमाचे प्रास्ताविक करताना दिली. दीपप्रज्वलन करुन कार्यक्रमाची सुरुवात झाली. विभागीय आयुक्त श्रीमती विजयलक्ष्मी बिदरी व राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठाच्या कुलगुरू डॉ. माधवी खोडे-चवरे यांचे स्वागत मनपा आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी केले. यावेळी जलपर्णी पासून तयार केलेल्या वस्तू भेट देण्यात आल्या. कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते रिता माटे, जयश्री टाक, रोझी भुते, छबू अंबुलकर, रंजना नागपुरे, दिव्यांग धनश्री पथाडे यांचा सत्कार करण्यात आला. तत्पूर्वी मान्यवरांनी केद्राची पाहणी करीत विविध वस्तूबद्दलची माहिती जाणून घेतली.

# शालार्थ आयडी घोटाळा

## एसआयटी सदस्यांची माहिती जाहीर करा

### मनसे शिक्षक सेनेची मागणी

■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ५ :
नागपूर जिल्ह्यात उघडकीस आलेल्या बोगस शिक्षक भरती व बोगस शालार्थ आय. डी. प्रकरणानंतर याची व्याप्ती दिवस शाळा असो की रात्रशाळा, मंत्रालयासह स्थानिक शिक्षण विभागाच्या कार्यालयापर्यंत राज्यभर घोळ पसरल्याचे चित्र स्पष्ट झालेले आहे. याचे पडसाद विधानपरिषदेसह विधानसभेतही उमटलेले आहे. जनमानसाच्या मनातील संताप लक्षात घेऊन सरते शेवटी शासनाचे वतीने एसआयटी (विषेश तपास पथक) स्थापन करण्याची घोषणा झालेली आहे परंतु आजही सर्वसामान्य जनतेला स्थापन केलेल्या एसआयटी मधील आय.ए .एस, आय. पी. एस. तसेच इतर शिक्षण तज्ज्ञ अधिकाऱ्यांची नावे शासनाचे वतीने प्रसिद्धी पत्रकाव्दारे जाहीर केलेली नाही.

सदर एसआयटी बाबतची माहिती सर्व सामान्य जनतेसाठी जाहीर करण्याची मागणी महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेतर सेने तर्फे शासनाकडे करण्यात आली आहे. वास्तविक अशा संयुक्त एसआयटी पथकाकडे प्रत्येक जिल्ह्यात जावून संबंधित घोटाळ्याची सुस्पष्ट चौकशीचे अधिकार दिले असताना जर काही शिक्षक संघटना, सर्वसामान्य जनता, पिडित कर्मचारी किंवा अशा घोटाळ्याशी संबंधित इतर तक्रारी द्यावयाचे असल्यास असली कुठलीही तजबिज शासनाने केलेली नाही. शालेय शिक्षण विभागात, मंत्रालयात शिक्षण उपसंचालक व शिक्षणाधिकारी/शिक्षण निरिक्षक यांच्या विभागीय चौकशी अहवाल प्रलंबित आहे. स्थानिक पोलिस स्टेशन मध्ये दिलेल्या तक्रारी प्रलंबित आहेत. त्याबाबत कुठलेही चौकशीचे निर्देश नाही. राज्यात शासनाने संयुक्त एसआयटी स्थापन केलेली असेल तर नागपूर, भंडारा, गोंदिया व वर्धा जिल्ह्यातील प्रकरणाची आत्तापर्यत चौकशी करीत असलेल्या स्थानिक एसआयटी पथकाव्दारे होणाऱ्या कारवाईवर प्रश्नचिन्ह निर्माण होत आहे. सदर घोटाळ्यामुळे शालेय शिक्षण विभाग, शिक्षक तथा शाळांची प्रतिष्ठा जनमानसात मलीन झालेली असून, सर्वसामान्य पालकांचा शिक्षकांकडे पाहण्याचा दृष्टिकोन संशयास्पद झालेला आहे.

स्थानिक एसआयटी व्दारे शिक्षकांवर झालेल्या अटक कारवाईमुळे शिक्षकांमध्ये व शिक्षक संघटनांमध्ये असंतोष वाढत असून,"चोर सोडून संन्यासाला फाशी" अशी परिस्थिती दिसून येत आहे.

महाराष्ट्र नवनिर्माण शिक्षक शिक्षकेत्तर सेना संघटनेच्या निवेदनात सदर घोटाळ्याची सखोल चौकशी करण्यासाठी कालावधी निश्चित करण्यात यावा, जिल्हानिहाय वेळापत्रक तयार करून घोटाळ्याशी संबंधित अधिकारी, संस्थाचालक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांची विशेष बंदोबस्तात विडिओ रेकॉर्डिंगसह सुनावणी घेण्यात यावी इत्यादी मागण्या मनसे शिक्षक सेनेचे शरद भांडारकर, महेश जोशी, देविदास काळाने, मनोज घोडके, नितीन किटे, रणजित वासाडे यांनी केली आहे.

# स्टेट बँकेच्या शाखा व्यवस्थापकाला शेतकऱ्यांचा घेराव
## कर्ज माफीपासून वंचित ठेवण्याचे बँकेचे कट कारस्थान

■ स्वप्निल राऊत
काटोल, दि. ५ :

नरखेड तालुक्यातील थडीपवनी येथील भारतीय स्टेट बँकेमध्ये आर्थिक वर्षे २०२४-२५ या हंगामाकरिता शेतकऱ्यांनी बँकेकडुन पीककर्जाची उचल केली होती. आर्थिक संकटामुळे शेतकऱ्यांनी पीक कर्जाची परतफेड केली नाही.

शासनाने ठरवलेल्या धोरणाप्रमाणे शेतकऱ्याची कर्ज माफी करायची हे आश्वासन दिले असताना आपल्याला कर्ज माफी मिळते अशी शेतकऱ्यांना कर्ज आशा होती परंतु त्या आशेवर पाणी फेरण्याचं काम स्टेट बँक थडीपवनी येथील शाखा व्यवस्थापकाडून करण्यात आले आहे. शेतकऱ्यांना न कळवता बँकेने शेतकऱ्यांचे कर्ज खाते नुतनीकरण करण्यात आले आहे. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी शाखा व्यवस्थापकाला घेराव घेऊन शाखा व्यवस्थापकाला विचारणा केली असता उडवाउडवीची उत्तरे शाखा व्यवस्थापकाकडुन देण्यात आली. त्यामुळे संतप्त शेतकऱ्यांनी तीव्र आंदोलनाचा इशारा बँकेला दिला. यावेळी सागर दुधाने विदर्भ अध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना व मयूर उमरकर माजी सदस्य पं. स. नरखेड यांनी शेतकऱ्यांचे नेतृत्व केले.



(शेतकऱ्यांना अंधारात ठेऊन त्यांच्या खात्यातील रक्कम परस्पर काढणे चुकीचे आहे; मॅनेजरचा FIR करून शेतकऱ्यांना न्याय मिळवून देऊ.)
**सागर दुधाने विदर्भ अध्यक्ष क्रांतिकारी शेतकरी संघटना)**

(आमची कोणतेही पुर्वसंमती न घेता शाखा व्यवस्थापकांनी परस्पर त्यांच्या स्तरावर माज्या कर्ज खात्याचे नुतनीकरण केले.)
**चेतन खोडे कर्जदार शेतकरी**

(आम्हाला बँकेकडून मॅसेज आल्यानंतर आम्हाला कळले की आमचे कर्ज खात्याचे नुतनीकरण करण्यात आले.आमच्यावर बँकेने अन्याय केला आहे.)
**सचिन इंगोले कर्जदार शेतकरी**

# प्रधानमंत्री आवास योजना अंतर्गत नवीन घरकुल नोंदणी अभियान

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ५ :

शहरामध्ये प्रधानमंत्री आवास योजना (श ) 2.0 अंमलबजावणी करण्यांत येत असून शहरामध्ये योजनेचा प्रचार व प्रसार करणे सुरू आहे. दि. २८ जुन २०२५ रोज सोमवारला नवीन घरकुल नोंदणीसाठी ऑनलाईन नोंदणी अभियान तसेच शिबिराचे आयोजन नगरपंचायत समाजभवन कार्यालयात करण्यात आले होते. सदर शिबिरामध्ये हिंगणा शहरातील लोकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद नोंदवला असून नागरिकांचे फॉर्म ऑनलाईन करण्यात आलेले आहे.

नगरपंचायत तर्फे घरोघरी सर्वेक्षणाचे काम सुरू असून पात्र नागरिकांना या योजनेच्या लाभ मिळावा यासाठी नगरपंचायत प्रशासन कटिबद्ध असल्याचे हिंगणा शहराचे मुख्याधिकारी धनंजय सरनाईक यांनी याप्रसंगी सांगितले.

योजनेचा लाभ घेण्यासाठी अर्जदाराने, सर्व कुटुंब सदस्यांचे आधार कार्ड (लिंक केलेले), उत्पन्नाचा दाखला वार्षिक उत्पन्न ३ लाख रुपयांपेक्षा कमी असावे, अर्जदाराचे बँक पासबुक (राष्ट्रीयकृत बँक व आधार लिंक), २० वर्षापूर्वीपासून कोणतीही घरकुल योजना न घेतलेली असावी, अर्जदाराचे कुटुंबाचे नावावर देशात कुठेही पक्के घर नसावे, जमिनीचे/ घराचे दस्तऐवज मालमत्तेचे पुरावे, रजिस्ट्री, पट्टा, टॅक्स पावती इत्यादी आवश्यक कागदपत्रांसनगर पंचायत हिंगणा कार्यालयाशी संपर्क साधून या योजनेंतर्गत सहभाग नोंदवावा.



# गुणवंतांचा गौरव व हेल्मेट वितरण

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ५ :

महाराष्ट्राचे लाडक मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस (देवा भाऊ) यांच्या वाढदिवसानिमित्त भारतीय जनता पार्टी प्रभाग क्रमांक ३५, नरेंद्रनगरतर्फे सामाजिक व प्रेरणादायी उपक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

नरेंद्रनगर येथील उज्वल सोसायटीतील ज्येष्ठ नागरिक सभागृहात हा कार्यक्रम उत्साहात पार पडला. या उपक्रमात विद्यार्थ्यांमध्ये रस्ते सुरक्षिततेबाबत जागरूकता निर्माण करण्यासाठी हेल्मेट वितरण कार्यक्रम आयोजित करण्यात आला. सुरक्षिततेसोबतच विद्यार्थ्यांना समाजातील जबाबदार नागरिक म्हणून घडविण्याचा संदेश यावेळी देण्यात आला.

या प्रसंगी नरेंद्रनगर मंडळाचे अध्यक्ष महेंद्र भुगावकर, महामंत्री भूषण केसकर, नगरसेविका विशाखा मोहोड, प्रभाग बूथ अध्यक्ष आनंद खापरे, प्रशांत दशपुत्रे, स्वाती लांजेवार, मंगेश बंगाले, कावळे व पांढरीपांडे यांची प्रमुख उपस्थिती होती. या कार्यक्रमात नरेंद्रनगर मंडळाचे ओबीसी आघाडी प्रमुख युवराज पागोरे यांचे चिरंजीव करण पागोरे याचा विशेष सत्कार करण्यात आला. करण पागोरे याची राज्यस्तरीय पॉवरलिफ्टिंग स्पर्धेत निवड झाली असून, त्याचबरोबर नुकत्याच झालेल्या सीएओ अँड नासा स्टुडन्ट ऑफ द इयर ट्रॉफी-नॅशनल असोसिएशन स्टुडन्ट आर्किटेक्चर या राष्ट्रीय स्पर्धेत भारताच्या पहिल्या पाच विद्यार्थ्यांमध्ये निवड झाली आहे.

या यशामुळे त्याने शहराचे नाव राष्ट्रीय पातळीवर उज्वल केले आहे. गुणवंत विद्यार्थ्यांचा सन्मान, सुरक्षिततेचा संदेश आणि सामाजिक जबाबदारी या त्रिसूत्रीमुळे कार्यक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले. विद्यार्थ्यांच्या कर्तृत्वाने समाजात प्रेरणेची नवीन ऊर्जा निर्माण होईल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.



## प्रत्येक शाळेत १४ ऑगस्टला होणार पसायदान पठण

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

विश्वाच्या निरंतर कल्याणासाठी संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊलींनी ईश्वराजवळ पयासदान मागितले. मराठी साहित्यातील हा एक ठेवा अमूल्य ठेवा आहे. सन 2025 हे माऊलींच्या 750 व्या जयंतीचे वर्ष आहे. यानिमित्ताने माऊलींनी पसायदानातून दिलेला विचार राज्यातील प्रत्येक शाळेत एकाच वेळी पोहचावा यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या निदेर्शानुसार येत्या 14 ऑगस्ट रोजी राज्यातील प्रत्येक शाळेत पसायदानाचे पठण करण्यात यावे, असे आदेश शालेय शिक्षण विभागाने राज्यातील शाळांना दिले आहेत. शालेय शिक्षण आणि क्रीडा विभागाचे उपसचिव तुषार महाजन यांनी पुणे येथील शिक्षण विभागाच आयुक्तांना यासंदर्भात कळविले आहे. शिक्षण आयुक्त कार्यालयाकडून हे आदेश राज्यातील सर्व अनुदानित, विना अनुदानित, खासगी, महापालिका, जिल्हा परिषद, संस्थात्मक शाळांना कळविण्यात आले आहेत. 15 ऑगस्ट रोजी गोकुळ अष्टमीला संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर माऊली यांची 750 वी जयंती आहे.

# अण्णाभाऊंच्या विचारांची समाजाला गरज : दिनेश बन्सोड



■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ५ :

दलित साहित्याचे जनक, संयुक्त महाराष्ट्र चळवळीचे अग्रणी, थोर समाज सुधारक, जगविख्यात साहित्यसम्राट, महाराष्ट्रात वैचारिक परिवर्तन घडविणारे लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची १०५ व्या जयंती निमित्त वाडी येथे वंचित बहुजन आघाडी कार्यालयात माजी जि.प.सदस्य दिनेश बन्सोड यांच्या पुढाकाराने विशेष अभिवादन कार्यक्रम संपन्न झाला.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला साहित्यरत्न अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेस उपस्थित वाडी न.प.चे ब्रँड अँबेसिडर नरेशकुमार चव्हाण, वरिष्ठ सामाजिक कार्यकर्ते शिवशंकर ताकतोडे, गुरुदास बावणे, जनार्दन गजभिये आदी मान्यवरांच्या हस्ते माल्यार्पणासह अगरबत्ती, मेणबत्ती प्रज्वलित करून अभिवादन करण्यात आले. यावेळी अण्णाभाऊ साठे हे केवळ साहित्यिक नव्हते तर वंचित, श्रमिक, भटक्या विमुक्त समाजाच्या वेदनांना वाचा फोडणारे सामाजिक क्रांतिकारक असल्याचे सांगून अण्णाभाऊ यांचे विचार प्रत्यक्ष अंमलात आणणे हीच खरी जयंती ठरेल असे प्रतिपादन नरेशकुमार चव्हाण यांनी व्यक्त केले.तर जनहित फाउंडेशन चे अध्यक्ष शिवशंकर ताकतोडे, गुरुदास बावणे यांनीही समायोजित मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे अध्यक्ष दिनेश बन्सोड यांनी अण्णाभाऊंच्या विचाराची कास धरून श्रमिक, वंचित, पीडितांसाठी विधायक कामे करण्याची गरज असल्याचे मत व्यक्त केले.

संचालन विजय वानखेडे यांनी तर आभार प्रेम ठवरे यांनी मानले. यावेळी जनार्दन गजभिये, भीमराव कांबळे, विश्वनाथ कुकसे, ईश्वर उके, प्रेम ठवरे, भिमराव शेंडे, भगवान मेश्राम, भगवान दवणे, अजय हुमणे, संजय भोरगडे, नाजूक मेश्राम, अशोक मेश्राम, अनिल वानखडे, आनंद रामटेके, नितीन वाघमोडे, प्रवीण तायडे, भोजराज नंदागवळी, चंदू सोनपिंपळे, जितेंद्र पानतावणे, मिलिंद कांबळे, राजकुमार मेश्राम, आनंद बोरकर, उमेश खोब्रागडे, शैलेंद्र फुले, प्रकाश रामटेके, हंसराज मेश्राम, राजेश धारगावे, दिनेश रामटेके, प्रेम कुमार पुरके उपस्थित होते.

## पीक स्पर्धेसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**नागपूरः** शेतक-यांना प्रोत्साहन देऊन गौरव केल्यास त्यांची इच्छाशक्ती आणि मनोबल यामध्ये वाढ होऊन आणखी उमेदीने नवनवीन अद्ययावत तंत्रज्ञानाचा वापर केला जाईल. यामुळे कृषि उत्पादनामध्ये भर घालण्यासाठी शेतकऱ्यांचे योगदान मिळेल. तसेच त्यांचे मार्गदर्शन परिसरातील इतर शेतकऱ्यांना होऊन राज्याच्या एकूण उत्पादनात मोलाची भर पडेल, हा उद्देश ठेऊन दरवर्षी राज्यांतर्गत पीक स्पर्धा योजना राबविण्यात येते. त्यानुषंगाने अन्नधान्य, कडधान्य व गळीतधान्य पीकस्पर्धा सन 2025-26 साठी राज्य स्तरावरून कृषी विभागामार्फत पीकस्पर्धा जाहीर करण्यात आल्या असून त्याच्या सविस्तर मार्गदर्शक सूचना कृषी विभागाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात आल्या आहेत. या स्पधेर्साठी अर्ज करण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

सर्वसाधारण व आदिवासी गटासाठी तालुका स्तरावरील पीक स्पर्धेमध्ये सहभाग घेऊन शेतकऱ्यांची आलेली उत्पादकता आधारभूत धरून राज्य, जिल्हा व तालुका स्तरावरील स्पधेर्साठी विजेत्या शेतकऱ्यांची निवड करण्यात येणार आहे. या स्पधेअंतर्गत खरीप (११) व रब्बी (५) हंगामातील एकूण १६ पिकांसाठी स्पर्धा घेतली जाणार असून, तालुका, जिल्हा व राज्य या तीन स्तरांवर स्पर्धकांची निवड होणार आहे. खरीप हंगाम सन 202५ पीक स्पधेर्साठी जास्तीत जास्त शेतकरी बांधवानी सहभाग घेऊन लाभ घेण्यात यावा.

# मो. रफी यांना स्थानिक गायकांची स्वरांजली

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :

एम.आर.के. म्युझिकल ग्रुप आणि अखिल भारतीय मराठी नाट्य परिषद, नागपूर शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने लोकप्रिय गायक मोहम्मद रफी यांच्या 45 व्या पुण्यतिथी निमित्त मुकेश, मो. रफी आणि किशोर कुमार यांना स्थानिक गायकांनी स्वरांजली अर्पण केली.

कार्यक्रमाला अखिल भारतीय मराठी नाट्य परिषदेचे नागपूर शाखेचे अध्यक्ष डॉ. अजय पाटील, सेंट पॉल स्कूलचे सचिव राजाभाऊ टांकसाळे, सामाजिक कार्यकर्ते महेश बंग, वाघमारे मसालेचे संचालक प्रकाश वाघमारे, ज्येष्ठ रंगकर्मी रूपाली मोरे आदी मान्यवर उपस्थित होते. या कार्यक्रमाची संकल्पना गायक राम खनगन यांची होती तर संगीत संयोजन परिमल जोशी व चमूचे होते. गायक रमेश अय्यर कार्यक्रमाचे संयोजक होते व सूत्रसंचालनाची मो. सलीम यांनी सांभाळली. यावेळी राम खनगन यांनी सदा जपु मैं तेरा नाम, जीवन से भरी तेरी आंखे, इंद्रकुमार वर्मा यांनी रंग और नुर की बारात, देखा है तेरी आंखों में प्यार, सरिता गडकरी यांनी जीवन के दिन छोटे सही हम भी, पुष्पा जोगे यांनी अगर तुम ना होते, विनोद दुबे यांनी ख्वाब हो तुम या कोई, जवानियां ये मस्त मस्त बिन पिये, रमेश अय्यर यांनी जानु क्या मेरा दिल अब कहाँ, मोहम्मद सलीम यांनी आते जाते खुबसूरत, ओम शांती ओम आदी गाणी सादर करून उपस्थित प्रेक्षकांकडून दाद मिळविली.



## फ्रुलाटोच्या यशामागे रिअल-टाईम लर्निंगचा मोलाचा वाटा : प्रणय कोल्हापुरे

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :

फ्रुलाटो या थिक शेक स्टोअरची सुरुवात कोणत्याही ठोस रोडमॅपविना झाली होती. मात्र, ग्राहकांचा अभिप्राय, बाजाराचा सतत अभ्यास आणि रिअल-टाईम लर्निंग आमचा ब्रँड घडत गेला, असे मत फ्रुलाटो थिक शेक्स इंडियाचे मुख्य कार्यकारी अधिकारी प्रणय कोल्हापुरे यांनी व्यक्त केले.

विदर्भ मॅनेजमेंट असोसिएशनच्या साप्ताहिक सत्रात ते बोलत होते. सिव्हिल लाइन्स येथील चिटणवीस सेंटरमध्ये आयोजित या सत्राची संकल्पना एक स्टोअरः स्थानिक ते जागतिक प्रवास ही होती.

कोल्हापुरे म्हणाले, धोरणात्मक फ्रँचायझी मॉडेल व देशविदेशातील कंपन्यांसोबत झालेल्या राष्ट्रीय पातळीवरील भागीदारीमुळे फ्रुलाटोने संपूर्ण भारतात ठसा उमटणे शक्य झाले. जनरेशन झेड आणि मिलेनियल्समध्ये ब्रँडची लोकप्रियता वाढवण्यासाठी आम्ही सेलिब्रिटी आणि स्थानिक इन्फ्लुएन्सर्ससोबत यशस्वी सहयोग साधला, असेही ते म्हणाले. फ्रुलाटो सध्या नेपाळ आणि दुबईसारख्या आंतरराष्ट्रीय बाजारपेठांमध्येही आपला विस्तार करत आहे. या सत्राचे सूत्रसंचालन धनश्री चिटनूरवार यांनी केले, तर सत्र प्रभारी म्हणून श्रीप्रसाद दुबे यांनी काम पाहिले.

# सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या जिल्हा शाखेची विशेष सभा संपन्न

■ महासागर प्रतिनिधी,
वाडी, दि. ५ :

सेवानिवृत्त शिक्षक संघटनेच्या जिल्हा शाखेची विशेष सभा संघटनेचे जिल्हा मुख्य सल्लागार सूर्यकांत वंजारी यांच्या अध्यक्षतेखाली नगरपरिषद शाळा क्रमांक ६ येथे पार पडली. या वेळी तालुका सरचिटणीस दीपक सावळकर, काटोल शाखेचे मुख्य सल्लागार सुरेश पाबळे, उत्कर्ष पतसंस्थेचे माजी अध्यक्ष व सल्लागार मंडळ सदस्य गोपाळ पोहने, तसेच काटोल शाखेचे उपाध्यक्ष सुरेश बाविस्कर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने करण्यात आली. सभेच्या कार्यसूचीप्रमाणे तालुका सरचिटणीस मधुकर फरतोडे यांनी विविध विषय सभेसमोर मांडले. यावर सविस्तर चर्चा झाली व सर्व ठराव संमतीने पारित करण्यात आले. यामध्ये विशेष ठराव म्हणून श्रावण महिन्यात सेवानिवृत्त शिक्षकांची श्री क्षेत्र सालबर्डी सहल आयोजित करण्याचा प्रस्ताव सादर करण्यात आला. या कल्पनेला सर्वसामान्य संमती मिळाली असून पुढील कार्यवाही करण्याची जबाबदारी मधुकर फरतोडे यांच्यावर सोपवण्यात आली. दुसरा विशेष ठराव म्हणून सेवानिवृत्त शिक्षकांची स्वतंत्र पतसंस्था स्थापन करण्यावर सखोल चर्चा झाली. पाबळे, पोहने, उत्तम मनकवडे व सुरेश बाविस्कर यांच्या मार्गदर्शनाखाली चर्चा पार पडली. या ठरावानुसार सवार्नुमते गोपाळ पोहने यांची मुख्य प्रवर्तक म्हणून निवड करण्यात आली.

त्यांनी पुढील कार्यवाही करण्याचे मान्य केले. कार्यक्रमाचे संचालन बेबी रोडे यांनी तर आभार मोरेश्वर साबळे यांनी मानले. आयोजनासाठी कार्यालय सचिव पुरुषोत्तम चरपे, संघटक अनिल जैवार, कुंती भालेराव, महादेव बारई व गुणवंत ढोबळे यांनी सहकार्य केले.



# रक्षाबंधन उत्सवाचा कार्यक्रम साजरा

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

लोककल्याण सेवा समिती बालगोकुलम तर्फे रक्षाबंधन उत्सव दीनदयाल सभागृहात साजरा करण्यात आला. या कार्यक्रमाचे आयोजन त्रिमूर्ती विभागातील सर्व शिक्षकांनी केले.उत्सवाची सुरुवात दीपप्रज्वलन व भारतमातेच्या पूजनाने झाली. प्रमुख पाहुणे म्हणून लेफ्टनंट कर्नलसारंग केळपुरे, सोनम केळपुरे, विंग कमांडर चेतन आनंद, विनय अंबुलकर आणि वैशाली पितळे उपस्थित होते.

सूत्रसंचालन सपना काळे यांनी केले. पाहुण्यांचा परिचय सौ. संध्या धाकतोड यांनी करून दिला. विद्यार्थ्यांनी व शिक्षिकांनी पर्यावरण संरक्षण राखी तयार करून ती सीमेवर असलेल्या वीर सैनिकांना भेट दिली. रंजना खडतकर यांनी एकल गीत सादर केले.

# सरकारचे आश्चर्यकारक रक्षाबंधन



**हिंगणा-बेसा वार्तापत्र**
**राजेंद्र सांभारे**

जगातील सर्वात पवित्र, निर्व्याज प्रेमाचे नाते म्हणजे भाऊ बहिणीचे नाते. राखी पौर्णिमाच्या दिवशी, याच भाऊ व बहिणीच्या नात्याला रक्षाबंधन म्हणून साजरे करण्यात येते. या दिवशी बहीण आपल्या लाडक्या भावाला राखीचा रेशमी धागा बांधून त्याचे कडून आपल्या रक्षणाचे वचन घेत असते. भाऊ देखील सर्व तन, मन, धनाने आपल्या बहिणीच्या मदतीला, तिचे रक्षण करायला तयार होतो; आणि या भावा बहिणीच्या प्रेमाला अधिक पक्के बनविण्याचे काम आई वडिलांचे असते. बहिणीचे रक्षण करण्यासाठी भावाला ताकतवर करण्याची जबाबदारी आईवडीलांची असते.

ह्याच प्रकारची आशा आपण आपल्या सरकार कडून केली तर काय बिघडते? कारण आपल्या माय-बाप सरकारने लाडकी बहीण योजने द्वारे लाडक्या गरीब बहिणींना जे काय ते दीड दोन हजार रुपये महिना देण्याचे ठरवून त्यांना सशक्त बनविण्याचे काम सुरू केलेले आहे. पण त्याच बरोबर लाडक्या गरीब भावांना मात्र ताकतवर करण्याची जबाबदारी आई वडीलांची असते; हे मायबाप सरकार पार विसरलेले दिसते. उलट गरीब भाऊ हे लाडके नसून दोडके आहे की काय अशी परिस्थिति तयार केलेली दिसते. कारण आमच्या शेतकरी बांधवांना आज शेतीच्या कामांना रोजंदारी शेतमजूर मिळेनासे झालेत. याचे कारण जे आमचे हिंगणा तालुक्यातील शेतकरी बांधव अनुभवत आहेत. जे रोजंदारी शेतमजुर गेली बरीच वर्षे शतकरी बांधवांच्या खांद्याला खांदा लाऊन शेतीची कामे करायला आतुर असायचे, ते आज कामचुकारपणा करायला लागलेत. आता शेतकऱ्याला रोजंदारी मजुरांच्या मागे हात जोडून विनंत्या करीत फिरावे लागत आहे. तरीही रोजंदारी शेतमाजुर मिळणे कठीण झाले आहे.

शेतकऱ्याकडे आज घटकेला ना तर बैल जोड्या शिल्लक आहेत. ना ट्रॅक्टर विकत घेण्याएव्हडे पैसे आहेत, तो शेतकरी शेती कशी करणार? कारण आमच्या मायबाप सरकारने त्या सगळ्यांना अंत्योदय अन्न योजने द्वारे दोन- तीन रुपये किलोने म्हणजे जवळ जवळ फुकट राशन, संजय गांधी निराधार योजनेचे 600/- रुपये महिना, श्रावण बाळ योजना, इंदिरागांधी निवृत्ती वेतन योजना, विधवा निवृत्ती वेतन योजना, बेरोजगारी भत्ता, आदि अनेकानेक योजनांच्या मार्गाने व त्यात लाडकी बहीण योजने प्रमाणे त्या रोजनदारी मजुराच्या कुटुंबाला महिना पांच सात हजार रुपये सहज बिना मेहनतीचे मिळू लागलेत.

लाडकी बहीण बघताना लाडके भाऊ दुर्लक्षित झालेत. ही कहाणी केवळ शेतकरी बंधूंचीच नाहीय तर आमच्या हिंगणा तालुक्यातील लघु उद्योजकांची पण आहे. त्यांना ही अकुशल कामगार रोजनदारीवर मिळत नाहीत. या स्थितीत दोडक्या भावांनी लाडक्या बहिणी सोबत रक्षाबंधन साजरे करणे आले आहे.

# अश्विन बैस यांचा अध्यक्षपदाचा पदग्रहण सोहळा



■ महासागर प्रतिनिधी, वाडी, दि. ५ :

विदर्भ हिंदी साहित्य संमेलन सभागृहात काँग्रेस पक्षाचे नवनियुक्त अध्यक्ष अश्विन बैस यांच्या पदग्रहण सोहळ्याचे आयोजन भव्य स्वरूपात करण्यात आले. या सोहळ्यात महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीच्या नवनियुक्त पदाधिकाऱ्यांचा सत्कार खासदार श्यामकुमार बर्वे, माजी मंत्री सुनील केदार,राष्ट्रीय सचिव प्रफुल गुडधे, माजी मंत्री राजेंद्र मुळक, आमदार अभिजीत वंजारी, आमदार संजय मेश्राम यांच्या उपस्थितीत करण्यात आला. यावेळी सुरेश भोयर, कुंदाताई राऊत, किशोर कान्हेरे, हुकूमचंद आमधरे, अवंतिका लेकुरवाडे, माजी जि.प. अध्यक्ष रश्मी बर्वे, माजी अध्यक्ष मुक्ता कोकड्डे, राजा तिडके, शकुर नागानी, याज्ञवल्क्य जिचकार, प्रकाश वसु, रमण चौधरी तसेच सर्व जिल्हा व तालुका पदाधिकारी, काँग्रेस पक्षाचे कार्यकर्ते आणि पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.कार्यक्रमात नवनियुक्त अध्यक्ष अश्विन बैस यांनी आपल्या मनोगतातून सर्व सहकाऱ्यांचे आभार मानले आणि पक्ष संघटनेच्या बळकटीसाठी कार्य करण्याची ग्वाही दिली.

## बसच्या धडकेत वृद्धाचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ५ :

रस्त्यावर खेळणी विकणाऱ्या एका वृद्धाला भरधाव बसच्या चालकाने चिरडले. यात वृद्धाचा घटनास्थळीच मृत्यू झाला. ही घटना सदर पोलिस ठाण्यांतर्गत घडली. प्रकाश भिकू पारधी (74) असे मृताचे नाव आहे.

प्रकाश हे मुळचे मध्यप्रदेश येथील रहिवासी होते. ते कुटुंबासोबत रोजगारासाठी नागपुरात आले होते. त्यांचे कुटुंब कस्तूरचंद पार्क परिसरात एक झोपडे बांधून राहते. पारधी कुटुंब मुलांसाठी खेळणी बनवून चौका-चौकात सिग्नलवर त्यांची विक्री करतो. दुपारी 1 वाजताच्या सुमारास प्रकाश पाणी आणण्यासाठी संविधान चौकात जात होते. कस्तूरचंद पार्क मेट्रो स्थानकाजवळ एका बसच्या चालकाने त्यांना जबर धडक दिली आणि पळून गेला.

गंभीर जखमी प्रकाश यांना उपचारार्थ मेडिकल रुग्णालयात नेले असता डॉक्टरांनी तपासून मृत घोषित केले. या प्रकरणी पोलिसांनी प्रकाश यांची सून कलीबाईच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदवत तपास सुरू केला आहे.

# खानगाव जि.प शाळेतील गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व कौतुक सोहळा



■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ५ :

श्री गुरुदेव सेवा मंडळ शाखा काटोलकडुन मागील वर्षी ग्रामगीता जीवन विकास परीक्षेत उत्तीर्ण झालेल्या सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा कौतुक सोहळा आयोजित करण्यात आला होता.

यावेळी शालेय समितीचे अध्यक्ष रवींद्र कौरती, केंद्रप्रमुख राजु धवड, गुरुदेव सेवामंडळच्या जिल्हा प्रचारक नंदा पाटमासे, काटोल तालुका सेवाधिकरी धन्यश्वर पाटमासे तालुका कोषाध्यक्ष श्री पिलाजी थोटे साहेब, खानगाव शाळेच्या मुख्याध्यापिका कविता थोटे, जूनेवाणी शाळेचे मुख्याध्यापक दिलीप केने, फेटरी शाळेच्या मुख्याध्यापिका कविता बोंद्रे उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात वंदनीय राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांच्या प्रतिमा पूजनाने झाली यावेळी जिल्हा प्रचारक पाटमासे नंदा यांनी वं. राष्ट्रसंत तुकडोजी महाराजांच्या जीवनकार्याचा व मानवी जीवनात ग्रामगीता या ग्रंथाचे महत्त्व विषद केले. तसेच केंद्रप्रमुख राजु धवड यांनी ग्रामगीता हा ग्रंथ विद्यार्थी संस्कारक्षम घडविण्यासाठी किती महत्त्वाचा आहे याविषयी मार्गदर्शन केले.

पिलाजी थोटे यांनी विद्यार्थ्यांना आदर्श जीवन कसे असावे यबाबत मार्गदर्शन केले. सर्व गुणवंत विद्यार्थ्यांचा अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते जीवन विकास परीक्षा प्रमाणपत्राचे वाटप करून कौतुक करण्यात आले. त्याचबरोबर मागील शैक्षणिक सत्रात सर्व शिष्यवृत्तीधारक विद्यार्थ्यांचा सुद्धा पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला व प्रेरणादायी मार्गदर्शन करण्यात आले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापिका कविता थोटे यांनी तर संचालन मनोज वानखेडे यांनी केले कार्यक्रमाचे आभारप्रदर्शन सौ रेखा मोहोड मॅडम यांनी केले कार्यक्रमचा समारोप राष्ट्र वंदनेने करण्यात आला. यावेळी शाळेच्या शिक्षिका वंदना घोरमाडे, स्वाती बनसोड व ममता केळकर उपस्थित होत्या.

# फ्रेंडशिप डे निमित्त राय टाउनमध्ये वृक्षारोपण



■ महासागर प्रतिनिधी, हिंगणा, दि. ५ :

फ्रेंडशिप डे निमित्त श्री. सिद्धिविनायक सोसायटी, राय टाउन २ येथे रविवारी वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. या उपक्रमात सोसायटीचे रहिवासी, विविध मान्यवर, महिला मंडळ आणि चिमुकले मोठ्या संख्येने सहभागी झाले. प्रत्येकाने एका झाडाची साथ देत पर्यावरण संवर्धनाचा संदेश दिला. या कार्यक्रमास ईसासनी वाघधारा शहर अध्यक्ष लीलाधरजी पटले, सोसायटीचे अध्यक्ष राजूभाऊ वनवे, भाजप युवा मोर्चा महामंत्री अभिषेक मल्लिक, भाजपा डिगडोह महामंत्री विनोद शेखर राऊत, तसेच मुन्शी, धीरज सिंह, तुषार शिरभाते, नरेंद्र पाटील, मनोज बीसोंई, नितीन बर्गट, मिलिंद टोपरे, अरविंद सिंह, खुशाल पराते, माधव राणे, जनार्दन गैरकर, प्रसन्न जोशी इत्यादी मान्यवरांची उपस्थिती लाभली. महिला वर्गातून सोनाली दळवी, सुरेखा राऊत, शारदा वनवे, पूजा बर्गर, ललिता शिरभाते, संगीता बाजन्घाटे, मानसी थेंबदेव, वंदना गैरकर, अंकिता बनाईत, मनीषा मुन यांनीही सक्रीय सहभाग नोंदवला.

# आमची देशीच बरी गा...!

## विदेशी' महागली; तळीरामांची देशीकडे गर्दी.....!!!



### तळीरामांचा 'देशी' कडे वाढला कल!

विदेशी दारूच्या किमती आवाक्याबाहेर गेल्याने अनेक पट्टीच्या तळीरामांनी 'देशी'चा आसरा घेतल्याचे दिसत आहे. एकतर देशी दारूच्या किमतीत केवळ १० रुपयांनी वाढ झाली आहे. दुसरे म्हणजे गेल्या काही वर्षांत देशी दारू उत्पादन करणाऱ्या कंपन्यांनी वेगवेगळ्या चवीचे आणि वासाचे अनेक ब्रेड बाजारात आणले आहेत. यापैकी काही ब्रँडची तर विदेशी ब्रेडशीही तुलना होते. परिणामी अनेक विदेशी शौकीन तळीराम आजकाल देशी दारूकडे वळताना दिसत आहेत. गेल्या काही दिवसांत देशी दारूच्या विक्रीत प्रचंड प्रमाणात वाढ झाल्याचे काही देशी दारू दुकान चालकांनी सांगितले.

■ महासागर प्रतिनिधी
मौदा, दि. ५ :

राज्य शासनाने विदेशी दारूच्या करामध्ये वाढ केल्यामुळे विदेशी दारूच्या किमती प्रतर क्वार्टर ५० ते २०० रुपयांनी वाढल्या आहेत. या वाढीव किंमती परवडत नसल्याने अनेक तळीरामांनी आपला मोर्चा 'देशी' दारूकडे वळविल्याचे दिसत आहे.

शासनाने गेल्या महिन्यात देशी, भारतीय बनावटीची विदेशी आणि विदेशी दारूवर १० टक्के व्हॅट, १५ टक्के परवाना शुल्क आणि ९ ते ७० टक्के जादा उत्पादन शुल्क लावण्याचा निर्णय घेतला आहे. शासनाने नवीन दर हा दारूच्या नवीन एमआरपीनुसारचा स्टॉक बाजारात आल्यानंतर लागू करण्याचा निर्णय घेतला.

बारमध्ये भारतीय बनावटीच्या विदेशी दारूच्या किमती 70 ते 80 रुपयांपर्यंत वाढलेल्या आहेत. ही वाढीव किंमत अगदी गब्बर तळीरामांच्या खिशालासुद्धा परवडेनाशी झाली आहे. यामुळे अनेक तळीरामांनी आपला 'कोटा' कमी केलेला दिसत आहे, कुणी महागडे ब्रँड टाळून 'स्वस्तात मस्त ब्रेडला पसंती देत आहेत. तर कुणाचे रोजचे भरणारे अधिवेशन आता साप्ताहिकवर आलेले दिसत आहे. बारमधील मित्रामित्रांच्या मैफिलीही कमी झालेल्या दिसत आहेत. काहीजण बारमधील दर परवडत नसल्याने वाईन शॉपमधून दारूची खरेदी करताना दिसत आहेत.

या सगळ्याचा परिणाम म्हणून बारमधील भारतीय बनावटीच्या विदेशी दारूचा खप जवळपास ४० टक्क्यांनी कमी होत असल्याचा दावा काही बार चालकांनी' प्रतिनिधीं'शी बोलताना केलेला आहे. राज्य शासनाच्या वाढीव कर प्रणालीमुळे बार मालकांना फटका बसला असून बार तळीरामाविना ओस पडत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.

# महाराजा सभागृहात श्रीमद् भागवत कथा सप्ताह

■ महासागर प्रतिनिधी
हिंगणा, दि. ५ :

हिंगणा- वानाडोंगरी परिसरातील महाराजा सेलिब्रेशन हॉलमध्ये कथाव्यास श्रद्धेय पं. नंदकिशोर पाण्डेय महाराज यांचा श्रीमद् भागवत कथा व पार्थिव लिंगार्चन कार्यक्रम 30जुलै पासून नियमीत सुरु आहे. उद्याला पुणार्हूती बुधवारला सकाळी ९ते१२ श्री. नागद्वार स्वामी मावंद.तर सायंकाळी ७ वाजता आरती व नंतर रूद्राक्ष वितरण व महाप्रसादाचे आयोजन करण्यात आलेले आहे.

तरी आरती व महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजक धनराज बाबडे यांनी केले आहे. हा सप्ताह 30जुलै पासून दररोज सुरु आहे.गणपत बाबडे व सौ. लिलाबाई बाबडे हे मुख्य यजमान आहेत तर ऋषीराज हिरणवार व सौ. दुगार्बाई हिरणवार हे लिंगार्चन यजमान आहेत.

धनराज बाबडे वा प्रकाश बाबडे हे या कार्यक्रमाचे आयोजक आहेत. 30 जुलै पासून तर ५ऑगस्ट पर्यंत दररोज श्रद्धेय पं. नंदकिशोर यांचे विविध विषयांवर मार्गदर्शन सुरु होते.

त्यामध्ये गोकर्णो व्याख्यान, विदुर मैत्र संवाद, शिव-सती चरित्र, श्रीकृष्ण प्राकट्य नंदोत्सव, गोवर्धन लिला, कृष्ण रुख्मिनी मंगल,सुदामा चरित्र, कथा समाप्ती व व्यास पुजा यावर मार्गदर्शन करण्यात आले. उद्याला महाप्रसादाचा लाभ घेण्याचे आवाहन बाबडे परिवाराच्या वतीने करण्यात आले आहे.

# विदर्भस्तरीय खासदार चषक समूहगीत गायन स्पर्धेला प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

बालकला अकादमी व स्त्री शिक्षण प्रसारक मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने विदर्भातील शाळांसाठी आयोजित करण्यात आलेल्या राष्ट्रभक्तीपर खासदार चषक समूहगीत गायन स्पर्धेच्या प्राथमिक फेरीला सोमवारी प्रारंभ झाला. कविवर्य सुरेश भट सभागृहात सुरू झालेल्या या स्पर्धेच्या आज पहिल्या दिवशी वर्ग 1 ते 5 या अ गटातील प्राथमिक फेरीमध्ये नागपूरसह विदर्भातील 27 शाळांनी सहभाग नोंदवला.

सकाळी नऊ वाजल्यापासून भट सभागृहात शाळकरी मुलांची




गर्दी बघायला मिळाली. विविध शाळांतून आलेल्या मुलामुलींच्या समूहाने प्रत्येकी दोन गीते सादर केली. यावेळी बालकला अकादमीच्या अध्यक्ष मधुरा गडकरी, स्त्री शिक्षण प्रसारक मंडळाच्या सीमा फडणवीस यांची प्रमुख उपस्थिती होती.

ब गटाची प्राथमिक फेरी 6 ऑगस्ट रोजी सकाळी 8.30 वाजेपासून सुरेश भट सभागृहात होणार आहे. स्पर्धेची अंतिम फेरी शनिवार, 16 ऑगस्ट रोजी स्मृती भवन, रेशीमबाग येथे होईल.

# नक्षी येथे महाराजस्व अभियानाचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी
भिवापूर, दि. ५ :

छत्रपती शिवाजी महाराज महाराजस्व अभियान अंतर्गत आज गट ग्रामपंचायत नक्षी येथे घेण्यात आले. समाधान शिबिर आयोजन दि. १ ते ७ ऑगस्ट महसूल सप्ताह राबविण्यात येत आहे त्या निमीत्य नक्षी व वडध येथील नागरीकांना पट्टे वाटप, सनद वाटप, जिवंत 7/12 फेरफार लाभार्थ्यांना प्रदान करण्यात आले.

सदर कार्यक्रमाला उपस्थित भिवापुरचे तहसीलदार बि.डी. टेळे स, कल्याणी वैद्य नायब तहसीलदार भिवापुर, सरपंच अनिकेत वराडे, भिवापूरचे ठाणेदार जयप्रकाश निर्मल, सोनसरे मॅडम उपअधीक्षक भुमी अभिलेख, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या, उपअभियंता खापरे, SBI बँकेचे बँक मॅनेजर चरडे साहेब, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा नक्षी मुख्याध्यापिका नंदाताई गिरडकर, आरोग्य विभागाचे अधिकारी, उपसरपंच राजेंद्र आदमने, सदस्य विवेक जगताप, गजानन समर्थ, नर्मदा खोब्रागडे सविता करकाडे, कविता आदमने, संगीता नक्षीने, जयश्री भोयर, ज्ञानेश्वर तुरक, प्रमोद राऊत, प्रभाकर राऊत, ज्ञानेश्वर वराडे, ग्रामपंचायत सचिव मुळे सतसेच सर्व तलाठी, पदाधिकारी संपूर्ण गावकरी मोठ्या प्रमाणात उपस्थित होते.

# द्रुगधामन्यात अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी

■ महासागर प्रतिनिधी
वाडी, दि. ५ :

द्रुगधामना येथील पार्श्वनाथ पब्लिक स्कूल आणि साई ताज पॉलिटेक्निक कॉलेजच्या वतीने साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णाभाऊ साठे यांची जयंती साजरी करण्यात आली. या निमित्ताने शाळेत विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.सर्वप्रथम शाळेचे अध्यक्ष उदय टेकाडे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण केले. वंशिका बदन, साक्षी चव्हाण, प्रकाश मांझी, यशश्री खोब्रागडे, लावण्या बागडे, सागर पटेल तमन्ना झा या विद्यार्थ्यांनी त्यांच्या प्रसिद्ध पुस्तकांवर आधारित भाषणे, कविता, नाट्याचे सादरीकरण, तसेच अण्णाभाऊ साठे यांच्या कायार्चा गौरव करणारी गीते ही सादर केली. उदय टेकाडे यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकला. मुख्याध्यापिका अन्नु पाल यांनी अण्णाभाऊ साठे यांच्या कायार्चे महत्त्व सांगितले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या विचारावर चालण्याची प्रेरणा दिली. यावेळी साई ताज पॉलिटेक्निकचे प्राचार्या अहमद, पार्श्वनाथ पब्लिक स्कूलच्या उपमुख्याध्यापिका सुजाता गुरवे उपस्थित होते. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी निशा सल्डाणा, नाजनीन खान, ओमलता बांबोडे, मानसी यादव, उज्वला धोंगडे आदींनी सहकार्य केले.

# महिला कर्मचाऱ्याकडून लाखोंचा अपहार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

बिल भरणा केंद्रावर काम करणाऱ्या महिलेने अपहार करीत मालकाला 2.88 लाख रुपयांचा चुना लावला. ही घटना जरीपटका पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली. या प्रकरणी पोलिसांनी शैलेष शांताराम मेश्राम (40) रा. एमआयजी कॉलनी, नारा रोडच्या तक्रारीवरून गुन्हा नोंदविला आहे. वैशाली प्रभाकर गांगुलकर (21) रा. गीता गॅलक्सी अपार्टमेंट, जरीपटका असे आरोपी महिलेचे नाव आहे. शैलेष यांना विद्युत महामंडळ कार्यालयातून बिल भरणा केंद्राचे कंत्राट मिळाले होते. वैशाली त्यांच्याकडे कॅश कलेक्शन ऑपरेटर पदावर कार्यरत होती. 22 एप्रिल 2024 ते 29 ऑक्टोबर 2024 दरम्यान वैशालीने ग्राहकांकडून बिलाचे पैसे घेत पावती दिली आणि नंतर ती पावती रद्द करीत पैसे स्वतःसाठी वापरले. शैलेष यांनी खाते तपासले असता वैशालीने 2.88 लाख रुपयांचा अपहार केल्याचे पुढे आले. त्यांनी जरीपटका पोलिसात वैशालीविरुद्ध तक्रार दिली. पोलिसांनी फसवणुकीचा गुन्हा नोंदवून तपास सुरू केला आहे.

# सहसचिव आयशा पठाण यांना कंत्राटी कामगारांच्या वतीने निवेदन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

कंत्राटी कामगारांच्या समस्यानचे निवारण करण्याबाबत उपरोक्त विषयास अनुसरून नियमित कामगारांच्या रिक्त जागेवर कंत्राटी कामगार मागील १२ ते १५ वर्षा पासून नियमित पने काम करीत आहे. परंतु कंत्राटी कामगारांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे तरी या सर्व गोष्टींचे निवेदना द्वारे निराकरण करून देण्यात यावे ही विनंती. समस्या खालील प्रमाणे :

कंत्राटी कामगारांना सी एस आय सी व मेडिकलेम सुविधेचा कुठलाही लाभ नाही. कंत्राटी कामगारान कडून चालू लाइन मध्ये काम करून घेण्यात येत आहे या वेळी कामगारांन सोबत नियमित कामगार राहत नाही. कंत्राटी कामगारांना अद्याप ही सुरक्षा साधने, आय कार्ड, अद्याप ही देण्यात आले नाही. नॉन टेक्निकल कामगारांचा कंत्राट हा ३ महिन्याचा असून त्याला ११ महिन्याचा करण्यात यावा तसेच या कामगारांना वारंवार डॉक्युमेंट साठी मागणी करण्यात येत आहे ती तत्काळ बंद करण्यात यावी व या कामगारांचा पगार देखील ७



तारखेला करण्यात यावा.असे न झाल्यास संबंधित कंत्राट दारावर योग्य ती कार्यवाही करण्यात यावी. २०१९ नंतरचे नवीन सबस्टेशन मध्ये अनुभवी यंत्र चालक देण्यात यावे. ज्या कामगारांना नियमित कामगार आले म्हणून कामावरून कमी करण्यात आले आहे त्या कामगारांना प्रथम प्राधान्य देण्यात यावे. श्रीकृष शाखा कार्यालय येथे ३ ही यंत्रचालक फ्रेशर आहेत. असे अजून ३ ते ४ सबस्टेशन आहेत त्या ठिकाणी एस एन डी एल मधील जे अनुभवी कामगार आहेत त्यांना प्राधान्य देण्यात यावे याची देखील आपण दक्षता घ्यावी. वरील समस्या न मधे मुद्दा क्रमांक २ अपघात होण्याचे प्रमाण वाढले आहे ट्रेनिंग मध्ये देखील चांगल्या प्रकारची माहिती कामगारांना देण्यात येते परंतु त्या पद्धतीने काम करून घेतल्या जात नाही तरी आपण या सर्व गोष्टीवर योग्य तो तोडगा काढावा नाईलाजास्तव आम्हाला आंदोलनाची भूमिका घ्यावी लागेल. यावेळी संघटनेचे झोन अध्यक्ष समीर हांडे, सचिव अभिजित माहुलकर, योगेश सायवानकर कोषाध्यक्ष, सागर साबळे, कार्याध्यक्ष, सुकेश गुरवे संघटनमंत्री, गोलू पुडके सदस्य हे सर्व पदाधिकारी यावेळी उपस्थित होते.

# शाळकरी विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप

■ महासागर प्रतिनिधी
काटोल, दि. ५ :

नबीरा महाविद्यालयाच्या वाणिज्य विभागाच्या वतीने दरवर्षीप्रमाणे यंदाही शाळकरी विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक साहित्य वितरणाची स्तुत्य मोहीम राबविण्यात आली. ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना शिक्षणात मदत मिळावी या हेतूने ही मोहीम विशेष उत्साहात पार पडली.

या उपक्रमाअंतर्गत तालुका कारंजा येथील कन्नमवार ग्राम प्राथमिक शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या विद्यार्थ्यांना शालेय साहित्य वाटप करण्यात आले. मंगळवारी पार पडलेल्या या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना वह्यांमधील रिकाम्या पानांपासून तयार




केलेली पुस्तके, पेन्सिल, पेन, पाऊच तसेच थंडीच्या दिवसात उपयोगी पडणारे स्वेटर्स वाटण्यात आले.

विशेष उल्लेखनीय बाब म्हणजे, हे साहित्य महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी जमा केलेल्या जुन्या वह्यांपासून तयार करण्यात आले होते, ज्यातून पर्यावरणपूरक उपक्रमाची जाणीव देखील प्रकर्षाने दिसून आली.

याआधीही माध्यमिक शाळा दिग्रस येथील विद्यार्थ्यांनाही अशीच मदत करण्यात आली आहे.

कार्यक्रमाचे आयोजन वाणिज्य विभाग प्रमुख डॉ. वैशाली रुईकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आले. यावेळी शाळेचे मुख्याध्यापक नरेश चोपडे तसेच सहाय्यक शिक्षिका शीतल कळंबे उपस्थित होत्या.

या उपक्रमात डॉ. गोंगले, डॉ. पुनीत राऊत, प्रा. मुकेश जाधव, डॉ. गुणवंत खोरगडे, डॉ. कोमल नबीरा, डॉ. जयंत कळंबे, प्रा. विजीत वंजारी, प्रा. सौरभ ढोरे, प्रा. फाल्गुनी काठोळे, प्रा. मयुरी वाळके, प्रा. श्रुती शिरपूरकर, प्रा. नैना रेवतकर, प्रा. अंकुश इंगळे, प्रा. शिशिर कळंबे आणि तन्मय रुईकर यांचे विशेष सहकार्य लाभले.

या उपक्रमामुळे ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर हास्य फुलले असून, समाजातील शिक्षणविषयक जाणिवा अधिक बळकट झाल्याचे दिसून आले.

# विज्ञान शिक्षकांच्या गुणवत्ता संवर्धन कार्यशाळेला प्रारंभ

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

प्रा. राजेंद्र सिंह सायन्स एक्सप्लोरेटरी (पीआरएसएसई) आणि विद्या भारती (विदर्भ प्रांत) यांच्या संयुक्त विद्यमाने रेज रेनफोर्सिंग ॲकॅडमिक इन्स्ट्रक्शन ॲंड सायन्स एज्युकेशन या विषयावर आयोजित वार्षिक शिक्षक प्रेरणा कार्यशाळेला मंगळवारी प्रारंभ झाला. शालेय शिक्षणात अध्यापन व अध्ययन प्रक्रियेची गुणवत्ता वाढविण्यासाठी आणि राष्ट्रीय शिक्षण धोरण २०२० च्या प्रभावी अंमलबजावणीच्या दृष्टीने आयोजित करण्यात आलेल्या या कार्यशाळेचे उद्घाटन धरमपेठ एज्युकेशन सोसायटीचे सचिव व पीआरएसएसईचे सल्लागार सुरेश



देव यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी पीआरएसएसईचे सचिव रोहन पारखे, संचालिका डॉ. सीमा उबाळे यांची उपस्थिती होती. पुण्याचे प्रख्यात विज्ञान शिक्षक रविंद्र गोडबोले आणि धरमपेठ एम. पी. देव मेमोरियल सायन्स कॉलेजचे भौतिकशास्त्र विभागाचे सहाय्यक प्राध्यापक डॉ. गोविंद लाखोटिया यांना शिक्षकांना मार्गदर्शन केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कनिष्ठ शैक्षणिक प्रमुख राधिका कायंदे यांनी केले. रेज हा उपक्रम वर्षभर राबविण्यात येणार असून या शिक्षक गटासाठी पाच कार्यशाळांचे आयोजन करण्यात येणार आहे.

# सचिन देशमुख दिव्यांग सक्षमीकरण समिती सदस्य

■ महासागर प्रतिनिधी
कळमेश्वर, दि. ५ :

येथील स्थानीय सचिन राजेन्द्र देशमुख यांची नागपूर जिल्हा दिव्यांग सक्षमीकरण समितीवर पदसिद्ध सदस्य म्हणून निवड करण्यात आली असून ते जिल्हाधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली दिव्यांगांसाठी विविध उपक्रम राबविणार आहेत. यात दिव्यांगांच्या समस्या ऐकून त्या सोडविणे, निवेदने स्वीकारून प्रशासनाशी समन्वय साधून तोडगा काढणे, शासकीय योजना दिव्यांगांपर्यंत पोहचविणे, युडीआयडी कार्ड, स्वयंरोजगारासाठी मदत करणे, उद्योजकता प्रशिक्षण, रोजगार मेळावे, उपकरणांचे वाटप, शैक्षणिक व व्यावसायिक मार्गदर्शन आदींचा समावेश राहणार आहे.

# नामांतर शहिदांना बसपाचे अभिवादन

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :

मराठवाडा विद्यापीठाला बाबासाहेबांचे नाव देण्याचा ठराव 27 जुलै 1978 ला एकमताने विधानसभा व विधान परिषदेत पास झाल्यावर मराठवाड्यात अस्पृश्यांच्या विरोधात दंगली उसळल्या. त्या घटनेच्या निषेधार्थ 4 ऑगस्ट 1978 ला नागपुरात आंबेडकरी समाजाने मोर्चा काढला. मोर्चा संपल्यावर घरी परतलेल्या लोकांवर सायंकाळी पोलिसांनी गोळीबार करून अनेकांचे मुडदे पाडले. त्यात अब्दुल हमीद, शब्बीर अली, रतन मेंढे, किशोर काकडे, अविनाश डोंगरे आदी शहिदांना तसेच राज्यभरात शहीद झालेल्यांना



बसपाच्या वतीने इंदोरा परिसरातील शहीद स्मारकात शौर्यचक्र वाहून त्यांना अभिवादन करण्यात आले.

कही हम भूल ना जाये या बसपाच्या राष्ट्रीय अभियानांतर्गत आज 47 व्या स्मृती जागविण्यासाठी बसपाचे प्रदेश महासचिव पृथ्वीराज शेंडे, नागोराव जयकर, प्रदेश मीडिया प्रभारी व प्रवक्ते उत्तम शेवडे, योगीराज लांजेवार, जितेंद्र घोडेस्वार, संजय जयस्वाल, छाया सहारे, माया ऊके यांच्या प्रमुख उपस्थितीत अभिवादन रॅली काढून शहीद स्मारकाला पुष्पचक्र अर्पण करण्यात आले. याप्रसंगी शहिदांच्या सन्माना पित्यर्थ घोषणा देण्यात आल्या.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन जिल्हा महासचिव चंद्रशेखर कांबळे यांनी तर समारोप उत्तर नागपूर विधानसभेचे अध्यक्ष राजेश नंदेश्वर यांनी केला. याप्रसंगी प्रामुख्याने अभिलेश वाहाने, उमेश मेश्राम, विलास सोमकुवर, राजू चांदेकर, अविनाश नारनवरे, यशवंत निकोसे, तपेश पाटील, अनिल मेश्राम, देवेंद्र बनसोड, राजेंद्र सुखदेवे, निखिल नंदेश्वर, अमित गजभिये, सुबोध सहारे, संघर्ष वानखेडे, अविनाश गेडाम, स्वप्निल ढवळे, विकास नारायणे यांच्या सहित मोठ्या प्रमाणात पदाधिकारी व कार्यकर्ते उपस्थित होते.

# जिल्हा वार्षिक योजनेतून साकारल्या जाणाऱ्या विकासकामांची कल्पना स्थानिक लोकप्रतिनिधींना द्यावी

## पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचे निर्देश



■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत विविध विभागांना उपलब्ध करुन दिलेल्या निधीतून विविध योजना साकारल्या जातात. यातून नाविन्यपूर्ण योजना आकारास येतात. या कामांमधून विविध ठिकाणी असलेल्या इतर व्यावसायिक आस्थापनातून अप्रत्यक्षपणे स्वयंरोजगाची निर्मिती होत राहते. जिल्हा वार्षिक योजनेतील कामे निश्चित करताना यापुढे ज्या भागात ही कामे प्रस्तावित केली आहेत त्या भागातील लोकप्रतिनिधींना विभाग प्रमुखांनी कल्पना देऊन कामे प्रस्तावित करण्याचे निर्देश राज्याचे महसूलमंत्री तथा पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिले.

जिल्हा नियोजन भवन येथे आयोजित करण्यात आलेल्या बैठकीत ते बोलत होते. या बैठकीस महानगरपालिका आयुक्त डॉ. अभिजित चौधरी, नागपूर सुधार प्रन्यासचे सभापती संजय मिना, जिल्हाधिकारी डॉ. विपीन इटनकर, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विनायक महामुनी व वरीष्ठ अधिकारी उपस्थित होते.

जिल्हा वार्षिक योजनेअंतर्गत यापूर्वी ज्या विभागांकडे निधी वर्ग करण्यात आलेला आहे त्यांनी कोणत्याही स्थितीत येत्या 15 ऑगस्ट पर्यंत त्या-त्या योजनांसाठी शासन निर्णयानुसार निधी खर्ची घालण्याबाबत योग्य ती खबरदारी व पूर्तता करण्याचे निर्देश त्यांनी अधिकाऱ्यांना दिले. लोकाभिमुख प्रशासनासह सर्व सामान्य जनतेला शासकीय योजनांचा सुलभ लाभ पोहोचावा यासाठी आपण कटीबद्धता स्विकारली आहे. सर्वांसाठी घरे ही महत्वाकांक्षी योजना असून जिल्हा प्रशासन, मनपा, नागपूर सुधार प्रन्यास, जिल्हा परिषद यांनी परस्पर समन्वय ठेवून पट्टे वाटप मोहीमेला अधिक गती देण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले.

येत्या काही दिवसात विविध सण व उत्सवासह सर्वांच्या भक्तीचा गणेशोत्सव सुरु होत आहे. विविध मंडळांना त्यांना आवश्यक त्या परवानग्या, सुरक्षितता मिळावी, गणपतीचे विसर्जन श्रद्धापूर्वक करता यावे यासाठी कुत्रिम तलावाची निर्मिती ही कामे मनपाने युद्धपातळीवर केली पाहिजे. मनपाच्या प्रत्येक झोननिहाय एकखिडकी योजना यासाठी सुरु करण्यास त्यांनी सांगितले. जिल्हा प्रशासन, जिल्हा परिषद, महानगरपालिका, जिल्हा पोलीस अधीक्षक, एनएमआरडीए, पोलीस आयुक्त यांनी एकत्रित येऊन या गणेशोत्सवात अधिक सूत्रबद्ध होऊन नियोजन करावी, असे त्यांनी सांगितले.

# हॉटेलच्या खोलीत प्रेयसीवर अत्याचार

## कुटुंबीयांनाही मारहाण
### व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
व्यवसाय करण्यासाठी उसणे दिलेले पैसे परत मागण्यासाठी एका तरुणाने प्रेयसीला हॉटेलमध्ये भेटायला बोलावले. अश्लील व्हीडिओ व्हायरल करण्याची धमकी देऊन तेथे तिच्यावर जबरीने लैंगिक अत्याचार केला. त्यानंतर तिच्या कुटुंबीयांनाही जबर मारहाण केली. ही घटना बजाजनगर पोलिस ठाण्यांतर्गत उघडकीस आली आहे. पोलिसांनी पीडितेच्या तक्रारीवरून सुभाष धरमदास गजभिये (36) रा. दीक्षितनगर आणि त्याचे साथीदार अरविंद फटिंग व सुजीतविरुद्ध विविध कलमान्वये गुन्हा नोंदविला आहे.

सुभाष हा शिवसेनेचा पदाधिकारी असल्याची बतावणी करतो. 27 वर्षीय पीडितेच्या तक्रारीनुसार, एकाच परिसरात राहात असल्याने तिची सुभाषशी ओळख होती. सुभाषचे तिच्या घरीही येणे-जाणे होते. दोघांमध्ये प्रेमाचे अंकुर फुटले. लग्नाचे आमिष दाखवून सुभाषने वेळोवेळी पीडितेशी शारीरिक संबंध प्रस्थापित केले. या अत्यंत खासगी प्रसंगाचे त्याने फोटो आणि व्हीडिओही तयार केले. दरम्यान सुभाषने पीडितेला व्यवसाय करण्यासाठी 5 लाख रुपये उसणे दिले होते. या पैशातून पीडितेने एक शोरूम उघडले. मात्र व्यवसायात हानी झाल्यामुळे पीडितेने जुलै महिन्यात शोरूम बंद केले. तेव्हापासून सुभाष पैसे परत करण्यासाठी तिच्यावर दबाव टाकत होता.

गत 30 जुलै रोजी त्याने पीडितेला सुरेंद्रनगर परिसरातील हॉटेल सेव्हनमध्ये बोलण्यासाठी बोलावले. तिला हॉटेलच्या एका खोलीत नेऊन शारीरिक संबंधाची मागणी केली. पीडितेने विरोध केला असता त्याच्याकडे असलेले व्हीडिओ आणि फोटो व्हायरल करून बदनामाची धमकी दिली. त्यानंतर जबरीने तिचे लैंगिक शोषण केले. बदनामीच्या भीतीपोटी पीडितेने याबाबत कोणालाही सांगितले नाही.

रविवारी पीडिता तिच्या मित्र-मैत्रिणींसोबत मनीषनगरच्या एका हॉटेलमध्ये जेवण करण्यासाठी गेली होती. या दरम्यान सुभाष तेथे आला. पैशांची मागणी करीत पीडितेला मारहाण केली आणि फोन हिसकावून घेतला. पीडितेने घरी परतल्यावर कुटुंबीयांना संपूर्ण घटनेची माहिती दिली. कुटुंबीयांनी जाब विचारला असता सुभाषने तिच्या कुटुंबीयांना फोन करून शिविगाळ केली. रात्री 11.30 वाजताच्या सुमारास तो अरविंद आणि सुजीतसोबत पीडितेच्या घरी आला आणि तिच्या कुटुंबीयांना जबर मारहाण केली. त्यानंतर जिवे मारण्याची धमकी देऊन आरोपी पसार झाले.

पीडितेने घटनेची तक्रार पोलिसात केली. गुन्हा नोंदवून घेण्यासाठीही पीडितेला चांगलेच प्रयत्न करावे लागले. सांगण्यात येते की, काही अधिकाऱ्यांच्या माध्यमातून सुभाषने दबाव टाकण्याचाही प्रयत्न केला. पोलिस आरोपींचा शोध घेत आहेत.

# शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयातील हेरीटेज वृक्षांना वाचवा :आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :
सक्करदरा येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाच्या नवीन इमारतीकरिता अडथळे ठरणाऱ्या वृक्षांच्या कपातीची परवानगी मागण्यात आली आहे. नागपूर महानगरपालिकेचे आयुक्त तथा प्रशासक डॉ. अभिजीत चौधरी यांनी मंगळवारी (ता.५) या परिसराची पाहणी केली. पाहणीदरम्यान मनपा आयुक्त डॉ. चौधरी यांनी सार्वजनिक बांधकाम विभागाला आणि मनपाच्या उद्यान विभागाला बांधकाम करताना पुरातन वृक्ष वाचविण्यासह आवश्यक त्या वृक्षांचे पुनर्रोपण करून, पर्याय म्हणून नवीन झाडे लावण्याचे निर्देश ही दिले. याप्रसंगी मनपाच्या अतिरिक्त आयुक्त वैष्णवी बी., उद्यान विभागाचे उपायुक्त गणेश राठोड, उद्यान अधीक्षक अमोल चौरपगार, शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. राजेंद्र सोनकर, यांचासह सार्वजनिक बांधकाम विभागाच्या कार्यकारी अभियंता वर्ष घुसे व इतर अधिकारी उपस्थित होते.

सक्करदरा येथील शासकीय आयुर्वेदिक महाविद्यालय व रुग्णालयाचे सन १९६५ मध्ये बांधकाम करण्यात आले होते. आता राज्य शासनाने नवीन रुग्णालय आणि महाविद्यालयासाठी निधी मंजूर केली आहे. यामुळे महविद्यालयात स्नातक अभ्यासक्रमाची क्षमता १०० वरून २०० इतकी तर स्नातकोत्तर अभ्यासक्रमासाठीची क्षमता १०० इतकी होणार आहे. महाविद्यालयाची नवीन इमारत सात माळ्याची असणार आहे. तर रुग्णायलयाच्या खाटांचा संख्येतही वाढ होऊन ३६४ खाट इतके होणार आहेत. १५ एकर जागेमध्ये पसरलेल्या या महाविद्यालयाला २८ हेरिटेज आणि ३९२ नॉन हेरिटेज वृक्ष कापण्याची परवानगी हवी आहे. आयुक्त डॉ. अभिजीत चौधरी यांनी संपूर्ण परिसराची पाहणी केली, यावेळी संबंधित विभागांना हेरीटेज वृक्ष वाचविण्याचे निर्देश दिले.

## चाकू घेऊन फिरताना सापडला तडीपार

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :
अंबाझरी पोलिसांनी गस्तीदरम्यान एका तडीपार गुंडाला चाकू घेऊन फिरताना अटक केली. सुरेश उर्फ आवा विजय रामटेके (28) रा. संजयनगर असे अटकेतील तडीपाराचे नाव आहे. सुरेश हा सराईत गुन्हेगार असून त्याच्यावर अनेक गंभीर स्वरूपाचे गुन्हे दाखल आहेत. त्याची लगाम कसण्यासाठी गेल्या वर्षी ऑक्टोबर महिन्यात झोन दोनच्या डीसीपींनी त्याला एक वर्षासाठी जिल्ह्यातून तडीपार केले होते. या दरम्यान संजयनगर परिसरात एक तडीपार गुंड फिरत असल्याची माहिती पोलिसांना मिळाली. पोलिसांनी सुरेशला ताब्यात घेऊन झडती घेतली असता त्याच्या पॅन्टच्या खिशात चाकू मिळाला. सुरेश काहीतरी गुन्हा करण्याच्या उद्देशाने शहरात परतल्याचा संशय पोलिसांना आहे.

## नागपूर-पुणे स्लीपर वंदे भारत १५ ऑगस्टनंतर धावणार

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ५ :
येत्या १५ ऑगस्टनंतर नागपूर ते पुणे स्लीपर वंदे भारत रेल्वे सुरू करण्यासाठी तयारीला वेग आला आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते ऑगस्टमध्ये तीन रेल्वेगाड्यांना हिरवी झेंडी दाखविली जाणार आहे. यात प्रामुख्याने नागपूर ते पुणे, बेळगाव-बेंगळुरू आणि श्री माता वैष्णो देवी कटरा-अमृतसर या वंदे भारत समावेश आहे.

गत वर्षाभरापासून वंदे भारत स्लीपर रेल्वे सुरु करण्यासाठी नियोजन केल्या जात होते. मात्र आता नागपूर ते पुणे स्लीपर वंदे भारत रेल्वे सुरू करण्यासाठी सर्व अडथळे दूर झाले आहे.

त्यामुळे येत्या १५ दिवसात वंदे भारत सुरु होणार असल्याची माहिती रेल्वेच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी दिली आहे. मध्यवर्ती स्थानकावरील पुनर्विकासाचे काम लक्षात घेता ही रेल्वे अजनी स्थानकावरुन सोडण्यात येणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते या ३ रेल्वेगाड्यांना हिरवी झेंडी दाखविली जाण्याची शक्यता असल्यामुळे रेल्वेकडून संपूर्ण तयारी केल्या जात आहे.

## ७०६ वाहन चालकांवर कारवाई

नागपूर : वाहतूक शाखा पोलिसांनी मोटार वाहन कायद्यान्वये विविध कलमांखाली एकूण ७०६ वाहन चालकांवर कारवाई करून ३,१०,७०० रुपयांचा दंड वसूल केला. त्याचप्रमाणे शहर पोलिसांनी महाराष्ट्र दारू बंदी कायद्यान्वये ६ व एनडीपीएस कायद्यान्वये १ अशा ७ प्रकरणात ७ आरोपींवर कारवाई करून १०,१७० रुपयांचा माल जप्त केला.

तसेच महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये २ प्रकरणात २ आरोपींवर कारवाई करून १,३२५ रुपयांचा मुद्देमाल जप्त केला. वरील सर्व मोहीम एकत्रितरित्या नागपूर शहर पोलिसांतर्फे राबविण्यात आली.

## आपत्ती व्यवस्थापन क्षमता तपासण्यासाठी मॉक ड्रिलचे आयोजन



■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :
मध्य रेल्वे, नागपूर विभागाने वरुड- मोर्शी सेक्शनमध्ये आपत्कालीन परिस्थितीत कर्मचाऱ्यांची तयारी तपासण्यासाठी नियमित मॉक ड्रिलचे आयोजन केले. या सरावाचा उद्देश सतर्कता, जलद प्रतिसाद, समन्वय व बचाव क्षमतांचा आढावा घेणे हा होता.

कल्पित परिस्थितीनुसार, गाडी क्रमांक 61103 मेमू (अमरावती ते नरखेड) किलोमीटर 761/12-13 दरम्यान दुपारी 15:00 वाजता एका काल्पनिक अपघाताला सामोरी गेली, ज्यात डब्याच्या दरवाज्यावर बसलेले काही प्रवासी खाली पडून गंभीर जखमी झाले. घटनेची माहिती मिळताच तात्काळ कारवाई करण्यात आली. 15:15 वाजेपर्यंत रुग्णवाहिका घटनास्थळी पोहोचली व जखमींना प्राथमिक उपचार देऊन रुग्णालयात पाठविण्यात आले. स्थानिक पोलिस कर्मचारी देखील घटनास्थळी दाखल झाले आणि बचाव कार्यात सहकार्य केले.

ही ड्रिल नियोजनबद्ध व पद्धतशीर रितीने पार पडली व 15:35 वाजता अधिकृतपणे मॉक ड्रिल म्हणून घोषित करण्यात आली. अशा प्रकारचे सराव नागपूर विभागात वेळोवेळी घेण्यात येतात, ज्यामुळे आपत्ती व्यवस्थापनातील तयारी वाढविणे, विविध यंत्रणांमधील समन्वय सुधारणे व खरी आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास प्रवासी सुरक्षेत बळकटी आणणे शक्य होते.

## स्वच्छतेविषयी जागरूकता वाढवण्यासाठी
# स्वच्छता स्पर्धेचे आयोजन

■ महासागर प्रतिनिधी,
नागपूर, दि. ५ :
मध्य रेल्वे, नागपूर विभागाने स्वच्छता ही सेवा या भावनेला प्रोत्साहन देण्यासाठी आपल्या स्थानकांवर व कार्यालयांमध्ये स्वच्छता स्पधेर्चे आयोजन केले. या उपक्रमाचा उद्देश कर्मचारी व प्रवाशांना उत्कृष्ट स्वच्छतेच्या पद्धती अवलंबण्यास प्रवृत्त करणे हा होता, ज्यामुळे सर्व रेल्वे प्रवाशांसाठी स्वच्छ व आनंददायी वातावरण सुनिश्चित करता येईल.

स्पर्धेत स्थानक परिसर, कार्यालये, कर्मचारी वसाहत व रेल्वे रुग्णालय अशा विविध श्रेणींचा समावेश होता. मूल्यांकनात कचरा व्यवस्थापन, स्वच्छतागृहे, सौंदर्यीकरण, प्रवासी सुविधा आणि सामुदायिक सहभाग अशा निकषांचा समावेश करण्यात आला.

वरिष्ठ अधिकारी व कर्मचारी यांचा समावेश असलेल्या तपासणी पथकांनी विविध ठिकाणी भेटी देऊन स्टेशन मास्टर, कर्मचारी व प्रवाशांशी संवाद साधला तसेच सामूहिक स्वच्छतेची जबाबदारी याविषयी जनजागृती केली. कार्यक्रमात एकदाच वापरल्या जाणाऱ्या प्लास्टिकचा वापर कमी करणे, कचऱ्याचे योग्य विभाजन व पर्यावरणपूरक साहित्याचा प्रसार यावरही भर देण्यात आला.

प्रत्येक श्रेणीतील विजेत्यांना आगामी स्वच्छता पंधरवड्याच्या समारोप सोहळ्यात गौरविण्यात येईल. या उपक्रमाने केवळ उत्कृष्टतेला मान्यता दिली नाही तर सातत्यपूर्ण स्वच्छता मोहिमा राबवण्यासही प्रेरणा दिली, ज्यामुळे भारतीय रेल्वेच्या सुरक्षित, स्वच्छ व प्रवासी-अनुकूल सेवांच्या बांधिलकीला पुन्हा अधोरेखित करण्यात आले.

नागपूर विभाग स्वच्छ रेल - स्वच्छ भारत या संकल्पनेला पुढे नेत, स्वच्छ व हिरव्या भारताच्या दृष्टिकोनाची पूर्तता करण्यासाठी सातत्याने प्रयत्नशील आहे.

# इंदोरा बुद्ध विहार मार्गावर गटाराची घाण



प्रमोद जांभुळकर
नागपूर, दि. ५
इंदोरा बुद्ध विहार मार्गावरील डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकात गटारीची सफाई करताना सफाई कर्मचाऱ्यांनी रस्त्यावरच घाण टाकल्याने परिसरात राहणाऱ्या लोकांमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

चार दिवसांपूर्वी सफाई कर्मचाऱ्यांनी या परिसरातील गटारींची साफसफाई केली. सफाई करताना गटारीतील घाण बाजूलाच रस्त्यावर फेकून दिली. परिसरातील लोकांनी ही घाण उचलण्यात यावी असे सफाई कर्मचाऱ्यांना बजावले. घाण उचलणारी कचरा गाडी आल्यानंतर ही घाण उचलण्यात येईल असे सफाई कर्मचाऱ्यांनी सांगितले. त्यानंतर सफाई कर्मचारी निघून गेले. कचरा गाडी येईल आणि घाण साफ होईल या आशेवर परिसरातील नागरिक होते. परंतु, चार दिवस झाले तरी या मार्गावरील घाण उचलण्यात आली नाही. त्यामुळे परिसरातील लोकांना आणि रस्त्याने येजा करणाऱ्या लोकांना बराच त्रास सहन करावा लागतो. या घाणीमुळे मच्छर आणि किटाणूंची पैदास होण्याची शक्यता असल्याने लोकांचे आरोग्य धोक्यात आले आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी या गंभीर समस्येकडे त्वेरेने लक्ष देऊन ही घाण साफ करावी अशी मागणी स्थानिक नागरिक स्नेहल राऊत, अमित शेंडे, अक्षय भालेराव, हर्षद खोब्रागडे, अक्षय मेश्राम यांनी केले आहे. त्याचप्रमाणे भविष्यात गटारी साफ करताना रस्त्यावर घाण होणार नाही याची काळजी घेण्याची विनंती देखील या लोकांनी केली आहे.

# महासागर प्रभाग वार्ता

## क्षयरोग वार्ड परिसरातील रस्त्यांची दयनिय अवस्था

महासागर प्रभाग मित्र
नागपूर, दि. ५
मेडिकल आणि प्रशासनाच्या उदासिनतेमुळे मेडिकलच्या क्षयरोग वार्ड परिसरातील रस्त्यांची दयनिय अवस्था झाली असून रुग्णालयात जाताना डॉक्टर आणि रुग्णांना त्रास सहन करावा लागतो.

त्वचारोग विभागाकडे जाणाऱ्या रस्त्यावर जागोजागी खड्डे पडले आहेत. जोराचा पाऊस झाल्यास या रस्त्यावर पाणी जमा होऊन तलावाचे चित्र तयार होते. या परिसरात त्वचारोग विभागासोबतच क्षयरोग विभागदेखील आहे. दरदिवशी त्वचारोग विभागात शेकडो रुग्ण येत असतात. सोबतच तेवढेच क्षयरोगी देखील येतात. कर्करोग रुग्णालयाचे बांधकाम सुरू असल्याने जड वाहनांची नेहमीच येजा सुरू असते. त्यामुळे हे रस्ते खराब झाले आहेत. रूग्णांनाच नाहीतर या दोन्ही विभागात काम करणाऱ्या डॉक्टर आणि कर्मचाऱ्यांना हा त्रास सहन करावा लागतो.

परिसरातील ऑक्सीजन प्लांटच्या समोर अनेक जुने विभाग बंद अवस्थेत आहेत. या बंद विभागाच्या आजूबाजूला झाडेझुडपे वाढली आहेत. झाडांमुळे किडे, किटकांचे प्रमाण वाढले आहे. रात्रीच्यावेळी साप देखील निघत असतात. जुने विभाग बंद अवस्थेत असल्याने ते तोडून त्याची साफसफाई करणे आवश्यक आहे.

# पालकमंत्र्यांच्या मतदारसंघात आपली बस येतच नाही



रजत पराते
नागपूर, दि. ५
पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मतदारसंघात बीडगाव येथे आपली बस येत नसल्याने परिसरातील नागरिकांना आणि विद्यार्थ्यांना बराच त्रास सहन करावा लागतो. बीडगाव येथील पंतप्रधान आवास योजना येथे सुमारे १० ते १२ हजार नागरिक वास्तव्य करीत आहेत. या नागरिकांमध्ये प्रामुख्याने मजूर वर्ग आहे. या लोकांना कामधंद्यासाठी शहरातील गांधीबाग, इतवारी आणि सीताबर्डी परिसरात जावे लागते. बीडगाव येथून आपली बसची सोय नसल्याने येथील रहिवाश्यांना खाजगी वाहनाने प्रवास करावा लागतो. त्यामुळे दररोज बीडगाव येथून आपली बस सोडण्यात यावी अशी मागणी या परिसरातील लोकांनी केली आहे.

मनपा परिवहन विभागाच्या वतीने आवास योजना ते सीताबर्डी अशी बससेवा आहे. मात्र, ही बससेवा शनिवार आणि रविवारी बंद असते. शिवाय शासकीय सुटीच्या दिवशी देखील बससेवा बंद राहते. परंतु, खाजगी काम किंवा हातमजुरी करणाऱ्या लोकांना सुटी राहत नाही. बससेवा नसल्याने कधी कधी हातमजुरी करणाऱ्या लोकांना कामावर जाता येत नाही. पालकमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांचा हा मतुदारसंघ आहे. परंतु, त्यांच्याच मतदारसंघात ही समस्या असल्याने इतर प्रभागाची व्यवस्था कशी असेल असा प्रश्न लोकांना पडला आहे.

लोकांनी दिलेल्या माहितीनुसार, या मार्गावर धावणाऱ्या आपली बसचे वाहक प्रवाशांकडून प्रवासभाडे घेतात परंतु, त्यांना तिकीट देत नाही. त्यामुळे येथील उत्पन्न मनपाला दिसत नसल्याने बससेवा सुरू करण्यात येत आही अशी माहिती आहे. त्यामुळे आपली बसच्या अधिकाऱ्यांनी ही समस्या लक्षात घेता बीडगाव येथून आपली बस सुरू करावी अशी मागणी लोकांनी केली आहे.

# जनावरे चोरीला जात असल्याने गावकरी संतप्त




आपली व्यथा व्यक्त करताना गोधनमालक

प्रफुल्ल पाटणकर
नागपूर, दि. ५
इसासनी ग्रामपंचायत अंतर्गत वागधरा क्षेत्रातील शुभमनगर परिसरातून दरदिवशी जनावरे चोरीला जात असल्याने गावकऱ्यांमध्ये संतापाचे वातावरण आहे.

मागील काही दिवसांपासून गाई चोरीला जाण्याचे प्रमाण वाढले आहे. सायंकाळच्या वेळी गावकरी आपल्या घरासमोर आपले गोधन बांधून ठेवतात. मात्र, रात्रीच्या वेळी हे गोधन चोरीला जात आहे. सकाळी उठल्यावर गोधन चोरीला गेल्याचे लक्षात येते. तोपर्यंत बराच उशीर झालेला असतो. गोधन चोरीला जात असल्याने लोकांना रात्रभर जागरण करावे लागते. परंतु, चोरटे हातात येत नाहीत असेही गावकऱ्यांनी सांगितले.

शुभमनगर निवासी ब्रिजेशकुमार तिवारी यांनी सांगितले की, रात्री उशीरापर्यंत त्यांची गाय घरासमोर खुट्याला बांधून होती. मात्र, पहाटे पाचच्या सुमारास गाय चोरीला गेल्याचे लक्षात आले. आजूबाजूला गाईचा शोध घेतला असता कुठेही मिळून आली नाही. तिवारी आपल्या गाईचा शोध घेत असतानाच गावातील अनेकांच्या गाई चोरीला गेल्याचे त्यांना समजले.

याप्रकरणी गावकऱ्यांनी एमआयडीसी पोलिस ठाण्यात पोहचून आपली तक्रार नोंदविली. त्याचप्रमाणे गोधन चोरून नेणाऱ्या चोरट्यांचा बंदोबस्त करावा अशीही मागणी करण्यात आली.

# मोकळ्या भूखंडाची स्वच्छता करा, अन्यथा भूखंड जप्त करू

## बहादुरा नगरपंचायतची तंबी

अंशुल जिचकार
नागपूर, दि. ५
बहादुरा येथे मोठ्या प्रमाणात मोकळे भूखंड असून या भूखंडात पावसाचे पाणी साचत असल्याने सर्वत्र दुर्गंधी पसरली असून रोगराई वाढण्याची शक्यता आहे.

अनेक लोकांनी बहादुरा परिसरात भूखंड खरेदी करून ठेवले आहेत. या परिसरातचा विकास न झाल्याने लोकांनी मोकळ्या भूखंडांवर बांधकाम केले नाही. त्यामुळे मागील अनेक दिवसांपासून हे भूखंड मोकळ्या अवस्थेत आहेत. सध्या पावसाळ्याचे दिवस आहेत. त्यामुळे मोकळ्या भूखंडात पाणी जमा होते. पाणी वाहून जाण्यासाठी पर्यायी व्यवस्था नसल्याने पाणी तेथेच साचून राहते. त्यामुळे सर्वत्र दुर्गंधी पसरली असून रोगराई उदभवण्याची शक्यता आहे.




नगरपंचायत कार्यालयाने असे फलक लावून लोकांना तंबी दिली आहे.

ही गंभीर समस्या लक्षात घेता बहादुरा नगरपंचायतने भूखंडधारकांना त्यांच्या भूखंडावर भराव भरावा. जेणेकरून पावसाचे पाणी जमा न होता सहजपणे बाहेर निघून जाईल. परंतु, ही सूचना भूखंडधारकांनी गांभीर्याने घेतली नाही. त्यामुळे बहादुरा नगरपंचायत आक्रमक झाली आहे. दिलेल्या कालावधीत भूखंडधारकांनी आपल्या भूखंडात भराव भरून स्वच्छ न केल्यास त्यांचा कर रद्द करण्यात येईल. सोबतच त्यांचा भूखंड जप्त करण्यात येईल अशी तंबी देखील दिली आहे. या आशयाचे फलक नगरपंचायतूने जागोजागी लावले आहेत.